
# हिंदुबोध

संपादक : रविकांत कळंबकर

विश्व हिन्दू परिषद
धर्मो रक्षति रक्षितः

■ शके १९४७ ■ वर्ष २५ ■ अंक ८ ■ नोव्हेंबर २०२५ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/– ■ पृष्ठ संख्या ३६
■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 25 ■ ISSUE NO 8 ■ November 2025 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 36



!! त्रिपुरी पौर्णिमेचा प्रकाश, होईल अधर्माचा नाश !!



घर असो वा गाडी, शिक्षण अथवा व्यवसायवृद्धी...
तुमचे स्वप्नं साकार करायला मदत जनता बँकेची!
जनता
गृहकर्ज
योजना
व्याजदर 7.75%* च्या पुढे | ₹3 कोटींपर्यंत अर्थसहाय्य
शिक्षण व वसतिगृह शुल्क, शैक्षणिक साहित्य, इ.साठी कर्ज
जनता
एज्युफ्लेक्स
कर्ज योजना
देशांतर्गत शिक्षणासाठी
₹ 50* लाख
परदेशी शिक्षणासाठी
₹ 1* कोटी
आकर्षक व्याजदर
जनता
वाहनकर्ज
कर्ज योजना
सुलभ प्रक्रिया । त्वरित कर्जवितरण
आकर्षक व्याजदर
आता प्रत्येक व्यवहार करा 'कॅशलेस'...
कारण जनता बँक सदैव तुमच्याबरोबर!
सुरक्षित, सोपी व गतिमान
इंटरनेट बँकिंग सुविधा
व्यापारी वर्गासाठी
कार्ड स्वाईप मशिन
रोजच्या व्यवहारांसाठी
जनता रुपे डेबिट कार्ड
तुमच्या सर्वप्रकारच्या बँकिंग व्यवहारासाठी
मोबाईल बँकिंग सेवा
JetPay
Digital India
BHARAT BILLPAY
जनता सहकारी बँक लि., पुणे
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258
www.janatabankpune.com
*अटी व नियम लागू

मासिक

# हिंदुबोध

वर्ष - पंचवीस : अंक ८ वा

शके १९४७

नोव्हेंबर २०२५

संपादक

श्री. रविकांत कळंबकर

ravi.kalambkar@gmail.com

निवास

एबीसी जंक्शन, ए बिल्डींग, फ्लॅट नं. ६,
आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ,
निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४

[redacted]

संपादक मंडळ

श्री. किशोर चव्हाण - प्रांत मंत्री
श्री. ॲड. सतिश गोरडे - प्रांत सहमंत्री
श्री. कृष्णकांत चांडक - प्रांत कोषाध्यक्ष
श्री. श्रीपाद रामदासी - प्रांत प्रचार-प्रसार प्रमुख
श्री. संजय गोडबोले - प्रांत प्रचार-प्रसार सहप्रमुख
श्री. अनिल सांबरे - नागपूर
श्री. विजयकुमार पिसे - सोलापूर

संपादक मंडळ सदस्य

श्री. नितीन वाटकर
प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी

पत्र व्यवहार

व्यवस्थापक
मनोज शेलार
मो: ९०४९३९६३६३

अंकमूल्य रु. २०/-, वार्षिक वर्गणी रु. २००/-

मुद्रण स्थळ

संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ, पुणे - ३०.
दूरभाष : २४४८ ५६ ३२
sanwadpvt@gmail.com

## अनुक्रमणिका

✦ संपादकीय.... त्रिपुरी प्रकाश... अधर्माचा नाश
रविकांत कळंबकर ........ ०५

✦ वि. हिं. परिषद प्रांत वृत्त ........ ०६

✦ चांगल्या बातम्या
कुमार आठवले ........ ०९

✦ संघ शतायु झाला!
ॲड. संकेत राव ........ ११

✦ त्रिपुरी पौर्णिमा - उत्सव दिव्यांचा
ॲड. स्वाती जेरे ........ १३

✦ होय! अहिल्यानगर जिल्ह्याने हिंदुत्व विचारधारा स्वीकारली आहे!
रवींद्र मुळे ........ १५

✦ म. गांधीजींची संघ शाखेला भेट संघाचे केलेले कौतुक
डॉ. गिरीष आफळे ........ १७

✦ पुराणातील इतिहास आणि इतिहासातील पुराण - लेखांक ९
हणमंत नाडगौडा ........ २०

✦ ब्राह्मोस क्षेपणास्त्र प्रणाली
काशीनाथ देवधर ........ २२

✦ विठ्ठला तू वेडा कुंभार
ब्रह्मानंद घुगरे ........ २७

✦ विकारग्रस्तांची चिखलफेक
विजयकुमार पिसे ........ २९

✦ अंगणातील तुळस आणि घरातील लेक हिंदुत्वाची शान
ॲड. स्वाती जेरे ........ ३१

✦ शिलाहार राजांची मंदिरे
शंतनू परांजपे ........ ३३

प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'हिंदुबोध' मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी - ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे - ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)

**"Hindu Bodh" Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar**

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

**उजाळिले तू तममय जीवन, संघयुगाचा शालिवाहन।।धृ।।**
**कर्म योग तव ज्वलंत प्रेरक, मातीतूनही उठले सैनिक**
**वाण सतीचे घेऊनि दाहक, प्रकाश फुलवित अंधारातून ।।१।।**

**सामर्थ्यातून तत्त्वाचा जय**
**धर्म रक्षण्या शक्तीसंचय**
**राष्ट्र आपुले हे मृत्युंजय**
**तूच वाहिले निजहवनातून ।।२।।**

**हिंदुत्वाचा विशाल सागर**
**विभीन्नतेच्या लाटा वरवर**
**परि अंतरी एकच सुस्वर**
**जागविले हे सत्य सनातन ।।३।।**

**तव शब्दांचे अमृत सिंचन**
**देशाचे या फुलले यौवन**
**पुरुषार्थाचे जगण्या जीवन**
**अगणित सेवक झीजले कणकण ।।४।।**

**महिमा आता संघयुगाचे**
**विशालतेचा उदात्ततेचा**
**जीवन इथले बहरविण्याचा**
**तुझी तपस्या मंगलपावन ।।५।।**

# आवाहन...

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत स्तरावर निघणारे एकमेव मासिक म्हणजे **''हिंदुबोध.''** कोरोनाचे पहिल्या लाटेनंतर म्हणजे फेब्रु. २०२१ पासून नवीन स्वरूपात निघणे सुरू झाले आहे. हा अंक ४४ पानांचा असून याचे मासिक मूल्य रु. २०/– फक्त आहे. वार्षिक रु. २००/– तर त्रैवार्षिक रु. ५००/– वर्गणी आहे. पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.

देव, देश अन् धर्मासाठी कार्यरत असलेल्या या कार्यासाठी आपण **हिंदुबोध** मासिकाचे नियमित वाचक व्हावे, ही विनंती. वर्गणी खात्यात भरून नोंद (नांव, पत्ता, पिनकोड क्र., संपर्क क्र.) कार्यालयाकडे कळवावी. आपल्याला दरमहा **''हिंदुबोध.''** ' दि. १ ते ५ काळात पोस्टाने मिळेल.

तसेच आपण नवीन वर्गणीदार वाचक व अंकासाठी जाहिरात मिळवून देण्यात योगदान द्यावे. ही नम्र विनंती. योग्य ते मानधन देण्यात येईल. कळावे, धन्यवाद!

**श्री. रविकांत कळंबकर**
(संपादक)

**श्री. किशोर चव्हाण**
(प्रांत मंत्री)

**श्री. पांडुरंग राऊत**
(प्रांत अध्यक्ष)

# त्रिपुरी प्रकाश... अधर्माचा नाश!

## संपादकीय

दसरा, दिवाळी सण मोठा, नाही आनंदाचा तोटा. ऑक्टोबर महिना खरोखरीच अश्या स्वरुपाचा होता. संपूर्ण देशात उत्साही आनंदी वातावरण होते. सर्वच स्तरांवर आनंदाच्या भरतीचे उधाणच आले होते. संघ स्वयंसेवकांमध्ये विजयादशमी ही विजया साठीचे सिमोल्लंघन करणारीच झाली. बाजारात आर्थिक उलाढाल ही मोठ्या प्रमाणात झाली. लोकांमध्ये खरेदीचा उत्साह ओसंडून वहात होता. याची सुरुवातच घटस्थापनेपासून झाली होती.

२२ सप्टेंबर २०२५, देशात आर्थिक विकासाला गती देणारे महत्त्वाचे पाऊल टाकले गेले. खरेदी-विक्रीवर लावला जाणारा सेवाकर नवीन स्वरुपात सुरु झाला. जीवनावश्यक वस्तूंपासून कपडे, वाहन, खाणे-पिणे, विद्युत उपकरणे सर्वच क्षेत्रांमध्ये मोठी बचत होत असल्याने त्याचा लाभ दुकानदारांचे व ग्राहकांचे समाधान झाल्याचे जाणवत होते. तीस दिवसांपैकी वीस दिवस रस्ते गर्दीने फुलून गेले होते. नवरात्रीच्या नऊ दिवसांत फुल बाजाराने या उलाढीलीची सुरुवात झाली होती. गणेशोत्सवानंतर दिवाळीमध्ये मेट्रोतून प्रवास करणाऱ्यांची संख्या उच्चांकीच नोंदली गेली. आता तर रोजच दिवसभर मेट्रोतून पुणेकर पूर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर प्रवासाचा लाभ घेत आहेत.

संघ शताब्दीचे वर्ष असल्याने संघ रचनेतून समाजात विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. पहिला कार्यक्रम म्हणजे विजयादशमीचे निमित्ताने संघ स्वयंसेवकांचे गणवेशामधील उपस्थितीची वाढ करणे असे होते. त्यानुसार केवळ गणवेशच नाहीतर शस्त्रपूजन कार्यक्रम, संचलन सर्वच ठिकाणी उत्स्फूर्त असा प्रतिसाद समाजाकडून स्वागतांचे माध्यमातून झालेला अनुभवला. जवळजवळ दिडपट वाढ झाल्याचे लक्षात आले. संघ संबंधीत संस्थांमधील कार्यकर्ते पण मातृसंस्थेच्या या महत्त्वाच्या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील सोलापूर-पंढरपूर भागातील स्वयंसेवकांची तर परीक्षाच ठरली. पावसाने कहर केला होता. अनेक भागात ओला दुष्काळ सदृश स्थिती होती. नदीला आलेला महापूर शेतात, घरात पाणी जाऊन आलेली आपत्तीजनक परिस्थिती, नागरिकांची मनःस्थिती खरोखरीच रडकुंडीला आली होती. सोलापूर शहर व जिल्ह्यात तर मे महिन्यापासून पावसाने कहरच केला होता. पाच महिन्यांतील वीस आठवडे असे होते की, एकही आठवडा पावसा विरहीत गेला नाही. सोलापूर जिल्ह्यात संघ स्वयंसेवकांनी 'सेवा भारती व जनकल्याण समिती' मार्फत तात्पुरती निवास रचना, भोजन व्यवस्था, धान्याचे किट पुरवणे व आरोग्याचे संदर्भात मोठ्या प्रमाणात सेवा कार्य आपले कर्तव्य याच भावनेने केले. अजूनही काही ठिकाणी हा उपक्रम चालू आहे. समाजातील सज्जनशक्ती मोठ्या प्रमाणात यात सक्रिय योगदान देत आहे.

मा. पंतप्रधानांनी १५ ऑगस्टच्या लाल किल्यावरील भाषणात स्वदेशीचा नारा दिला होता आणि सातत्याने ते विविध ठिकाणच्या कार्यक्रमांतही याचा पुनरुच्चार करत आहेत. स्वदेशी वस्तूंचीच विक्री करा आणि खरेदी करा, व्होकल फॉर लोकल, आयातीला मर्यादा, निर्यातीला चालना यातून आर्थिकतेला देशांतर्गत चालना मिळावी असा प्रयत्न सर्वांनीच करणे महत्त्वाचे आहे. स्वदेशीचा स्विकार आणि विदेशी वस्तूंवर बहिष्कार हा स्वभाव होणे आवश्यक आहे. यावेळी बाजारात काही प्रमाणात तर काही ठिकाणी आग्रहपूर्वक याचा स्विकार झालेला पहायला मिळाला.

५ नोव्हेंबरला त्रिपुरी पौर्णिमा आहे. कार्तिकेय स्वामींचे पूजन करुन दर्शन घेतले जाते. तसेच, या दिवशी बौद्ध धर्मातील सेनापती सारिपुत्रांचे परिनिर्वाण झाले होते. तर, शीख पंथाचे संस्थापक गुरु नानक यांची जयंती साजरी केली जाते. त्रिपुरी पौर्णिमेला 'हरिहर भेटीचा' उल्लेख आहे. शिव आणि विष्णूंची भेट झाल्याने महादेवाला तुळस तर विष्णूंना बेल वहाण्याची परंपरा आहे. तारक नावाच्या असुराचा वध झाल्यावर त्याच्या तीन मुलांनी ब्रह्मदेवांची कठोर तपश्चर्या करून तीन अढळ स्थानांचा वर मागितला होता. हीच ती त्रिपुरे. पुढे या त्रिपुरासुरांनी त्रिलोकात हाहाःकार माजवला. महादेवांनी त्यांना एकाच बाणात भस्म करून असंभव गोष्ट साध्य केली. विष्णूंनी दशावतारातील पहिला मत्स्य अवतार धारण करून पुढे सत्यव्रताचे तत्त्वज्ञान सांगितले व सृष्टीचे व्यवहार पूर्ववत केले. आजही आपल्याला आचार, विचार व व्यवहारातून विदेशी वस्तूंचा बहिष्कार व स्वदेशीचा स्विकार हाच त्रिपुर उत्सव साजरा करायवयाचा आहे. या त्रिपुरी पौर्णिमेला प्रत्येकाच्या घरात, दारात, मंदिरामध्ये गड, कोट, किल्ले यासारख्या वास्तूंच्या माध्यमातून प्रत्येकाच्या डोक्यात प्रकाश पसरावयाचा आहे.

हिंदू धर्मावर व संस्कृतीवर होणारी सर्व प्रकारची आक्रमणे यांनी पण त्रिपुर आसुरांसारखा उच्छाद मांडला आहे. त्याचाही संहार होणे आवश्यक आहे. 'मनाचे श्लोक' हा चित्रपट त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. आपल्यातीलच विकृत विचारसरणी हे करत आहे. अन्य धर्मीयांची नावे घेऊन अशी कलाकृती निर्माण करण्याचे धाडस नाही आणि म्हणूनच धर्माचा उदय व अधर्माचा नाश होण्यासाठी त्रिपुरारी पौर्णिमेचा वैचारिक प्रकाश प्रखर व्हावी अशी अपेक्षा.

**रविकांत कळंबकर, हिंदुबोध संपादक**



# मुंढवा येथे दुर्गाशक्ती जागरणनिमित्त संचलन

मुंढवा प्रखंड येथील शिवराज मित्र मंडळ कामगार मैदान या ठिकाणी दुर्गाशक्ती यात्रा व दुर्गाशक्ती जागरचे आयोजन केले होते.प्रारंभी मुंढवा गाव व जुने गावठाण भागात दुर्गाशक्ती यात्रा (संचलन) पार पडले. संचलनात घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. सामाजिक संस्था व नागारिकांनी फटाक्यांच्या आतिषबाजीने दुर्गाशक्ती यात्रेचे स्वागत केले.

दुर्गाशक्ती यात्रेत, दुर्गाशक्ती, मातृशक्ती, बजरंग दलाचा सहभाग होता. दुर्गांच्या लाठी–काठी, दंड व नियुद्धचे प्रात्यक्षिकाने उपस्थितांचे मने जिंकली. प्रांत मातृशक्ती सहसंयोजिका, सौ.आशा टेकवडे, शक्ती साधना केंद्र प्रांत प्रमुख कु. समृद्धी सराफ, दुर्गावहिनी विभाग संयोजिका, सौ. सुरेखा कवडे यांची उपस्थिती तर अध्यक्षस्थानी सौ. स्मिता सुहास बूथ होत्या.

त्रिवार ओंकार, एकात्मता मंत्र,विजय महामंत्र व शस्त्र पूजनाने सुरुवात झाली. दुर्गामाता व राम भजन दुर्गा सप्तश्लोकीचे सामूहिक पठण केले. प्रास्ताविक समृद्धीताई सराफ यांनी केले. सेवा, सुरक्षा, संस्कार आणि संघटनबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षा स्मिता सुहास बूथ यांनी कुटुंब प्रबोधन व व्यसनमुक्तीची माहिती दिली. एकत्र कुटुंबाचे फायदे विशद केले. व्यसनामुळे नवीन पिढी बरबाद होते त्यामुळे व्यसनमुक्ती अभियान राबवण्याचे आवाहन केले. मुंढवात पोलीस सेवा बजावणाऱ्या सौ. वर्षाताई पिसाळ व कृष्णाताई रुपनर या भगिनींचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. कार्यक्रमास सहकार्य करणारे शिवशक्ती मित्र मंडळाचे अध्यक्ष विजय शिखरे यांचा विभाग सहमंत्री संतोष अनगोळकर यांच्या हस्ते सन्मान झाला. सूत्रसंचालन दुर्गा वाहिनी प्रखंड सहसंयोजिका सौ. स्नेहलता कुलकर्णी प्रखंड मंत्री श्री. कुलदीप देशमुख, यांनी आभार मानले.

सदर कार्यक्रमास विभाग सहमंत्री पांडुरंग रोडे, हडपसर जिल्हा उपाध्यक्ष मनोज काळे, जिल्हा मंत्री, राजेंद्र शेवाळे, सहमंत्री, शशिकांत घाटे, विशेष संपर्कप्रमुख, आनंद भुसे, जिल्हा कार्यकारणी सदस्य, आबासाहेब गायकवाड, मातृशक्ती जिल्हा सहसंयोजिका, पुष्पलता गावडे, दुर्गावाहिनी जिल्हा सहसंयोजिका, नम्रता कुलकर्णी बजरंग दल सहसंयोजक ईश्वर राऊत, बजरंग दल सहसंयोजक ऋषीकेश बामणे, सातवडी प्रखंड मंत्री राहुल मोडक, छत्रपती संभाजी महाराज प्रखंड सहमंत्री विवेक रामदवे उपस्थित होते. भारत माता आरती, शांती मंत्र व राष्ट्रीय उद्घोषाने सांगता झाली.

एकूण उपस्थिती : ६३, महिला : ३१ पुरुषः २० बालः १२.

**वार्तांकन : श्री. राजेंद्र शेवाळे, मंत्री हडपसर जिल्हा.**

## मंचर येथे निदर्शने, विहिंपच्या मागण्या मान्य

विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून मंचर शहरात दर्ग्याच्या दुरुस्तीच्या वेळी ढासळलेल्या ठिकाणी मंदिर बांधकामासारखे काही अवशेष आढळून आले होते. पुरातत्व विभागाच्या माध्यमातून सर्वेक्षण करण्याच्या मागणीसाठी विहिंपतर्फे निदर्शने करण्यात आली.

तसेच जिल्हाधिकारी, आंबेगावचे आ.दिलीप वळसे पाटील व माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, पोलीस अधीक्षक गिल तसेच अप्पर पोलीस अधीक्षक, खेड, प्रांत जुन्नर आंबेगाव, तहसीलदार आंबेगाव व नगरपंचायत मुख्य अधिकारी यांच्या उपस्थितीत हिंदू व मुस्लिम समाजातील प्रमुखांची बैठक झाली. विहिंपची मागणी जिल्हाधिकार्यांनी मान्य करून सदर जागेचे सर्वेक्षण पुरातत्व विभागाच्या माध्यमातून केले जाईल. त्यानंतर हिंदू आणि मुस्लिम दोन्ही समाजाला मान्य असेल व तात्पुरत्या स्वरूपात त्या बांधकामाला सपोर्ट म्हणून तो खांब उभे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले. यावेळी

हिंदू समाज व हिंदू संघटनांनी प्रशासनाच्या भूमिकेवर लक्ष ठेवावे, असे ठरविले. गावातील हिंदू बांधव, संतोष खामकर प्रांत गोरक्षा गोसंवर्धन प्रमुख, प्रमोद बाणखेले, संदीप बाणखेले, गणेश बाणखेले, अश्विन बढे, चैतन्य महाजन, अक्षय चिखले, ॲड. स्वप्ना पिंगळे, बजरंगी यांनीही सहभाग नोंदवला.



## काशीवाडी खंड येथे दुर्गाशक्ती यात्रा

कसबा भाग दुर्गा वाहिनी आयामतर्फे दुर्गा शक्ती यात्रा काशी वाडी खंड येथे पार पडले. शंभोजी खंडाळे, अध्यक्ष भवानी प्रखंड व कु.शिवानी नेटके दुर्गावाहिनी संयोजिका भवानी पेठ प्रखंड यांनी संयोजन केले. ग्रामदेवता लक्ष्मी माता मंदिर ते धम्मपाल मित्र मंडळ महाराष्ट्र मित्र मंडळ, बीएसएनएल १० नंबर कॉलनी, पिंपळे मळा चौक येथून दुर्गाशक्ती यात्रा प्रारंभ झाली. फटाक्यांच्या आतषबाजीत देवीचे धार्मिक शस्त्र हातात धारण करून ५०० दुर्गा व बजरंगींनी यात्रेत सहभाग घेतला.

ठिकठिकाणी यात्रेचे स्वागत झाले. भारत माता की जय, हर हर महादेव जय श्रीरामच्या जयघोषाला स्थानिकांनी प्रतिसाद दिला. यात्रेचे व्यवस्थापन शिवम सोनवणे, रोहन, प्रवीण गवळी, बजरंग दल संयोजक भवानी प्रखंड रोहन खिल्लारे, विनोद खुडे, मंत्री जगताप गायकवाड व बजरंग दल संयोजक आकाजी चव्हाण, करण परदेशी यांनी केले होते.

धर्मरक्षक रामजी पाटोळे यांनी मार्गदर्शन केले. राजू करंडे, कार्तिकी परदेशी, सुकन्या काची, विजय कांबळे, जिल्हा मंत्री व बजरंग दल संयोजक विक्रम घुंगरूवाले, शैलेश जाधव, सेवा विभागाचे प्रतीक बोबडे, गोरक्षक व स्थानिक सामाजिक कार्यकर्ते लोकेश कोंढरे उपस्थित होते.

**वार्तांकन : कु.शिवानी नेटके,**
**भवानी प्रखंड दुर्गा वहिनी संयोजिका**

**विचारधन... स्वतःशी संवाद साधा.**

संसाराच्या रहाटगाडग्यात स्वतःच्या अंतरात्म्याला विसरून गेलेलो असतो. भौतिक सुखात गुंतून गेलेलो असतो की, स्वतःशी संवाद साधायचं विसरून जातो. स्व च्या सान्निध्यापासून दूर जात असतो. जीवनात खरी संपत्ती ही बाह्य जगतात नसून ती अंतःकरणातील संवेदनशीलतेत असते. एखाद्याचे दुःख समजून घेण्यासाठी त्याच्या जवळ जाणे आवश्यक असते. या जाणीवेतूनच आत अनेक भावनांचे रंग निर्माण होत असतात. त्यापैकी एक स्वच्छ शुभ्र करुणेचा रंग आत उमटत असतो. स्वतःचे अस्तित्व जाणून घेण्यासाठी किंवा दुसऱ्यांच्या भावनांना समजून घेण्यासाठी आपण आपल्या जन्मापासून आजवरचा जीवनप्रवास डोळ्यासमोर तरळू द्यावा. आपला दृष्टीकोन अधिक व्यापक कसा करता येईल हे पाहावे. जीवनप्रवासाचे खरे लक्ष्य भौतिक यशात नाही, तर मोक्ष व समाधी हेच अंतिम लक्ष्य असायला हवे. याचाच अर्थ, जिथे आपल्याला शेवटी पोहोचायचे आहे त्या ठिकाणाची आपण आधीच निश्चिती करायला हवी. मोक्ष किंवा समाधी अवस्थेच्या प्रवासात जात असताना हृदयात नम्रता व लीनता असावी. आपण जिथे पोहोचणार आहोत त्या जागेला मनःपूर्वक नमन करून मागे वळून पाहताना कुणावर अन्याय केला नाही ना? कटु शब्द बोलून कोणाला दुखावले नाही ना? दिलेला शब्द मोडला नाही ना? असेल प्रश्न स्वतःला विचारून पहा आणि त्याची उत्तरे मह अशी आली तर नक्कीच त्याविषयी मनापासून खंत वाटेल. अतृप्ती, असमाधान अशा स्मृतींना मागे सारुन आपल्या आत जोपर्यंत चेतना जिवंत आहे, तोपर्यंत त्या चेतनेचा सांभाळ करा. समाधीच्या उंबरठ्यावर उभे असताना कोणतेही काटे मनात सलत राहता कामा नये, भावनांचे पाश तोडता यायला हवेत. जरी हा अरूपाकडे जाण्याचा प्रवास असला, तरी समाधी अवस्था दिव्यस्वरूप आहे. मृत्यू हा प्रत्येकासाठी अटळ आहेच, पण समाधीस्थ होणं म्हणजे फक्त मृत्यू नसून स्वतःच्या अधिक जवळ जाणे होय. चैतन्य स्वरूप होणे किंवा आत्मस्वरूपाशी ओळख होणे होय. काया, मन किंवा स्वतःमधला ममी विसरून आत्मा शाश्वत आहे हे जाणून त्याच्याशी एकरूप होणे हेच समाधीचे सार आहे.

# ।। श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ।।

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि;
# श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे - ४१२२०७

कारखाना साईट : **EXABX No.** ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९

ईमेल : **smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com**

## कारखान्याची ठळक वैशिष्टे

- ✻ १० **MW** क्षमतेचा पॉवर प्लँट
- ✻ ४५०० **TCD** ऊस गाळप क्षमता
- ✻ ८० **KLPD** क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
- ✻ १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा **CNG** प्रकल्प
- ✻ ३० टन प्र. क्षमतेचा $CO^2$ प्रकल्प
- ✻ शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
- ✻ ३ **KLPD** क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती **(2G R & D)** प्लँट

---

**मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत**
अध्यक्ष व कार्यकारी संचालक

**मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर**
कार्याध्यक्ष

---

## संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. महेश संभाजीराव करपे | श्री. हेमंत संभाजीराव करंजे | श्री. योगेश दत्तात्रय ससाणे |
| श्री. अनिल जयवंतराव भुजबळ | श्री. किसन दिनकर शिंदे | श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम |
| श्री. अनिल लक्ष्मण बधे | श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे | श्री. माधव पांडुरंग राऊत |
| सौ. लता सतिष केंढे | श्री. हनुमंत बबन शिवले | श्री. भगवान दशरथ मेमाणे |

श्री. दत्ताराम मारूती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

## - मुख्य कार्यालय -

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता
आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

# चांगल्या बातम्या

नुकत्याच घडलेल्या व देशाच्या दृष्टीने चांगल्या, अशा खूप गोष्टी आहेत. पण त्यातील काही बातम्या खाली देत आहे. आपण यातील काही बातम्या कदाचित् वाचल्या असतील. तरी पण आपणासाठी परत एकदा पाठवत आहे.

१) २ ऑक्टोबर रोजी विजयादशमीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाली. शताब्दी वर्ष सुरू झाले. आणि या वर्षासाठी अनेक कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

केंद्र सरकारनेही शताब्दी वर्षानिमित्त १०० रुपयांचे नवीन नाणे (ज्यावर भारत मातेचे चित्र व तिला प्रणाम करणारे स्वयंसेवक आहेत) व ५ रुपयांचे पोस्टाचे तिकीट छापले आहे. (ज्यावर २६ जानेवारी १९६३ च्या गणतंत्र संचलनातील संघाच्या सहभागाचे चित्र व सेवा कार्यातील स्वयंसेवकांचे चित्र आहे.)

नेहमीप्रमाणे दसऱ्याला देशभर संघाची संचलने व विजयादशमी उत्सव साजरे झाले. पुणे महानगरात एकूण ५७ सघोष संचलने झाली. व त्यात २३,२१८ स्वयंसेवक पूर्ण गणवेशात सामील झाले होते.

२) २७ सप्टेंबर रोजी सैन्य दलाने भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड ला ३०,००० कोटी रुपयांच्या अनंत शस्त्र ह्या हवाई संरक्षण सामुग्री खरेदीचे काम दिले. सिंदूर कारवाई दरम्यान ही प्रणाली यशस्वी ठरली होती.

डिआर् डिओने विकसित केलेली जमिनीवरून हवेत मारा करणारी सुधारित अनंत शस्त्र प्रणाली, पूर्वीचे नांव QRS-M² (Quick Reaction Surface to Air Missile), ज्यामध्ये आधुनिक रडार, कमी पल्ल्याची क्षेपणास्त्रे, जॅमर्स, व लेसर यंत्रणा असेल. ही यंत्रणा ट्रक वरती ही बसवली जाईल. त्यामुळे त्याची हालचाल सुलभ होईल. यामध्ये दोन रडार असून एक १२० किलोमीटर पर्यंतचे, तर दुसरे ८० किमी पर्यंतचे ३६० डिग्री मधील लक्ष्य अचूक हुडकतात. तसेच ३० किलोमीटर पर्यंत च्या व १० किलोमीटर उंचीपर्यंतच्या लक्ष्याचा ही यंत्रणा अचूक वेध घेते. सध्या या यंत्रणेतील ९०% भाग हे स्वदेशी असून काही वर्षात ९९% भाग स्वदेशी असतील.

३) संरक्षण मंत्रालयाने पाचव्या पिढीचे डव्हान्स मल्टीरोल कॉम्बॅट विमान (AMCA) भारतात बनवण्याचा प्रकल्प जाहीर केला आहे. त्यामध्ये एलंड टी, टाटा, कल्याणी, अदानी, एच् ए एल् अशा एकूण ७ कंपन्यांनी / समूहांनी आपला मसुदा सादर केला आहे.

पाचव्या पिढीचे हे विमान एका वैमानिकाचे, दोन इंजिन असलेले, रडारला न सापडणारे, अद्ययावत क्षेपणास्त्रे नेणारे, सर्व हवामानात वापरता येणारे व –ख आधारित असेल. यामध्ये पहिल्या टप्प्यात ७०% पेक्षा जास्त भाग भारतीय असतील. इंजिन व काही गोष्टी परदेशी असतील. तर दुसऱ्या टप्प्यात शक्तिशाली इंजिनही भारतात बनवलेले असेल. डिआर् डिओ ने हे विकसित केले असून या सर्व कंपन्यांना उत्पादनासाठी त्यांचे सहकार्य मिळणार आहे.

या विमानाचे प्रोटोटाइप २०२६ अखेरीस/२०२७ च्या सुरुवातीस सादर करायचे असून, त्याच्या छाननीनंतर २०३२ पर्यंत निर्मितीला सुरुवात करून २०३५ पर्यंत ही विमाने वायुदलत सामील केली जातील.

४) २५ सप्टेंबर रोजी डीआरडीओ ने रेल्वेच्या वॅगन वरून मध्यम पल्ल्याच्या (२,००० किलोमीटर) अग्नि क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रक्षेपण केले. त्यामुळे आता रेल्वेने क्षेपणास्त्र कुठेही नेऊन वापरता येणे शक्य झाले आहे. जगामध्ये अमेरिका, रशिया, चीनच्या जोडीला आता भारत (४था देश) आला आहे.

५) २५ सप्टेंबर रोजी भारतीय हवाई दलाने ९७ तेजस लढाऊ विमाने खरेदी चा ६३ हजार ३७० कोटी रुपयांचा करार एच् ए एल बरोबर केला. २०२७–२८ पासून ही विमाने हवाई दलाला मिळतील. यापैकी ६८ विमाने ही लढाऊ, एका वैमानिकाची असून २९ विमाने दोन वैमानिकांची शिक्षणाची आहेत. यापूर्वी २०२१ मध्ये हवाई दलाने ८३ विमानांची ४८ हजार कोटींची ऑर्डर एच् ए एल ला दिली होती. एच् ए एल् आजकाल त्यांना लागणाऱ्या विमानांचे

पार्ट मोठ्या प्रमाणात अन्य खाजगी उद्योगांकडून घेत असल्यामुळे आता विमानांचा लवकर पुरवठा करणे त्यांना शक्य होत आहे.

नुकतेच विमानाला लागणारे पंख टाटांच्या कारखान्यात उत्पादन करून एच ए एल ला दिले गेले.

६) २५ सप्टेंबर २०१४ रोजी मेक इन इंडिया ची घोषणा करण्यात आली.

या २५ सप्टेंबर ला योजनेला ११ वर्षे झाली. या ११ वर्षात सर्व उद्दिष्टे जरी पूर्णपणे गाठली गेली नाहीत. तरी अनेक क्षेत्रात खूपच चांगली प्रगती झाली आहे.

केंद्र सरकारने उद्योगाच्या प्रगतीसाठी २७ क्षेत्रे निवडली व त्यात पीएल् आय् योजना राबवली. त्यामुळे अनेक क्षेत्रात उत्पादन नवीन सुरू झाले किंवा वाढले.

इलेक्ट्रॉनिक, संरक्षण, रस्ते, रेल्वे, इथेनॉल मिश्रण, बायो इकॉनॉमी वगैरे क्षेत्रातील उत्पादन वाढ लक्षणीय झाली. प्रथमच विमान निर्मिती, युद्ध नौका, पाणबुडी, वंदे भारत रेल्वे, इलेक्ट्रिक गाड्या, व त्यासाठी लागणाऱ्या बॅटरी, सोलर पॅनल व त्यांचे सेल अशा अनेक गोष्टी भारतात बनू लागल्या.

७४,८७८ कोटी डॉलर ची परदेशी गुंतवणूक आली.

व्यवसायातील सुलभतेत जगामध्ये भारताचा क्रमांक २०१४ मध्ये १४२ वा होता. तो २०२० मध्ये ६३ वा झाला. (पुढील आकडेवारी उपलब्ध नाही)

पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या. मालवाहतूक स्वस्त व जलद झाली. ऑक्ट्रॉय बंद झाला. जीएस् टी मुळे करात सुलभता आली. विजेची मागणी खूप वाढूनही कुठेही विजेची टंचाई जाणवत नाही.

हजारो स्टार्टअप सुरू झाले. तसेच संशोधनही वाढले.

७) २०१८ साली इस्रो ने नवीन प्रकल्प जाहीर केला. ज्यामध्ये अंतराळातील अद्यापही उकल न झालेल्या अनेक गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी प्रचंड क्षमतेच्या अंतराळ दुर्बिणींची निर्मिती.

इस्रो च्या निवृत्त अधिकारी श्री केंभावी यांच्या अध्यक्षतेखालील चमूने आलेल्या सर्व अर्जांचा अभ्यास करून आय् आय् टी मुंबई ची निवड केली. तेथील भौतिक विभागातील प्रा. श्री वरुण भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली अंतराळ दुर्बिणी साठी त्यांचा दक्ष प्रकल्प मान्य झाला. इस्रो ने बीज निधी दिल्यावर आयआयटी मुंबईने, पुण्यातील आयुका व अन्य दोन संस्थांच्या मदतीने, त्याचा सर्व आराखडा तयार करून सादर केला व तो मंजूर ही झाला. यामध्ये पृथ्वी च्या दोन्ही बाजूला दोन उपग्रहावर मोठ्या दोन दुर्बिणी बसवल्या जातील.

सध्या नासाची स्विफ्ट व नासा आणि युरोपची फर्मी या दोन दुर्बिणी, जगात सर्वात अद्ययावत मानल्या जातात. दक्ष प्रकल्पातील दुर्बीणी ह्या फर्मीपेक्षा ५ पट आणि स्विफ्ट पेक्षा १३ पट जास्त क्षमतेच्या असतील.

८) २७ सप्टेंबर रोजी भारत संचार निगमने (BSNL) उभारलेल्या ९२,६३३ टॉवरचे उद्घाटन पंतप्रधान श्री नरेंद्र जी मोदी यांनी केले. यापैकी ९,००० टॉवर्स हे महाराष्ट्रात आहेत. तसेच भा. सं. निगमच्या संपूर्ण स्वदेशी ४ऋतंत्रज्ञान आधारित सेवेचे लोकार्पण ही त्यांनी केले.

१७ वर्षानंतर प्रथमच २०२४-२५ वर्षातील तिसऱ्या तिमाहीत २६२ कोटी व चौथ्या तिमाहीत २८० कोटी नफा भा.सं. निगमने मिळवला.

**कुमार आठवले**

◈ ◈ ◈

**विश्व हिंदू परिषद व हिंदुबोधच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा**

**डॉ. गायत्री सतिश गोरडे, नेत्रतज्ञ (MBBS, M S (Ophthamology) Fellowship in CORNEA)**

# संघ शतायु झाला!

'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ – व्यक्ति निर्माणाचा एक सिद्ध मंत्र!' या मंत्राची विशेषता अशी की, हा मंत्र जपावा लागत नाही तर तो क्षणोक्षणी, दररोज जगावा लागतो. आपल्या कृतीतून, सामाजिक भावनेतून, देशभक्तीतून, सेवाभावातून आणि समरसतेतून अनेक स्वयंसेवकांच्या जीवनरूपी समिधेला पवित्र त्यागाच्या अग्नीत अर्पण करून सिद्ध झालेला हा सेवायज्ञ आज शतकपूर्ती करीत आहे.

संघ शताब्दी वर्ष पूर्ण करीत आहे. हा स्वयंसेवकांसाठी जरी उत्साहाचा क्षण असला तरीही, संघ आणि समाज वेगळे नाहीत. त्यामुळे हा उत्सव फक्त संघाचा नाही तर भारतीय समाजाचा आहे. भारतवर्षातील हिंदू समाज सनातनी आहे. त्याचा आदि आणि अंत कोणी सांगू शकणार नाही. अशा या शक्तिशाली समाजाला मधल्या काळात परकीय राष्ट्रविरोधी शक्तींमुळे आत्मशक्तिहीनतेचा आजार झाला. त्या आजारावर 'संघशक्ती' नावाच्या प्रतिकारक शक्तीने हिंदू अस्मितेला पुनश्च जागृत करण्याचे पवित्र कार्य केले.

संघाचे कार्य काही वेगळे नाही, आणि संघ असा काही विशेष पण नाही. संघ हा सामान्य आहे. संघाचे सर्वसामान्य असणे आणि समाजात समरस असणे हेच संघाला विशेष बनवते. हिंदू समाजाला पूर्णत्व देणे, त्याला जागृतत्व मिळवून देणे हेच संघाचे कार्य आहे. संघ प्राधान्य देतो इथल्या हिंदू समाजाला आणि येथील संस्कृतीला.

देशातील हिंदू समाजाच्या राष्ट्रशक्तीने छत्रपती शिवाजी महाराज घडविले, गुरु गोविंदसिंग घडविले, महाराणा प्रताप घडविले. त्याच हिंदू समाजाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे रसायनही निर्माण केले. या निर्माण कार्याचे, या संघगंगोत्रीचे भगीरथ होण्यासाठी ईश्वराने पू. डॉ. केशव हेडगेवार यांची निवड केली. आणि आज पू. डॉ. हेडगेवार यांनी रोवलेले हे संघाचे बीज विशाल वटवृक्षामध्ये परिवर्तित झाले आहे.

आज संघ शताब्दीच्या उंबरठ्यावर उभा आहे. मागील शंभर वर्षांचा इतिहास पाहिला तर अनेक आव्हाने, संघर्ष आणि प्रपंच यांचा सामना करताना संघ अधिकच बळकट होत गेला. हे बळ केवळ संघटनात्मक शक्तीचे नाही, तर भारतीय समाजाच्या आत्मशक्तीचे आहे. त्या आत्मशक्तीला जागृत करून तिला राष्ट्रीय ध्येयाशी जोडण्याचे कार्य संघाने केले आणि करत आहे.

प्रत्येक संघटनेचे एक ध्येय ठरलेले असते. संघाचे ध्येय अगदी प्रत्येक भारतीयाच्या स्मृतीत कोरले जाणारे आहे 'परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्रम्' म्हणजे या राष्ट्राला परमवैभवावर नेणे. मागील १०० वर्षांपासून सुरू असणारा हा भगीरथ प्रयत्न संघ करीत आहे.

कार्य करत राहणे, फळाची अपेक्षा न ठेवता 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या गीतेच्या श्लोकाप्रमाणे असंख्य कार्यकर्त्यांनी आपले तन–मन–धन राष्ट्रकार्याला अर्पण केले. याची प्रचीती अनेक संघ प्रचारकांच्या जीवनगाथेतून आपल्याला येते. स्वयंसेवकांनी सेवा है यज्ञकुंड समिधा सम हम जले या गीतातील भाव प्रत्यक्ष जीवनात उतरवला आहे. त्यामुळेच आपण आज शताब्दी वर्षाची अनुभूती घेतोय.

संघ आजही तरुण संघटन म्हणून राष्ट्रसेवेसाठी सज्ज उभा आहे. ईश्वर अवतरण होण्यापूर्वी अनुकूल वातावरण तयार होत असते. धर्मसंस्थापनेसाठी जेव्हा परमेश्वर कलियुगात अवतरतील, त्यावेळी सज्जनशक्तीचे संघटन आवश्यक असेल. ते संघ मागील १०० वर्षांपासून तयार करीत आहे आणि पुढेही करत राहील. म्हणूनच आपण नेहमी म्हणतो संघकार्य हे ईश्वरीय कार्य आहे.

संघकार्य म्हणजे प्रत्येक कामासाठी व्यक्ती आणि प्रत्येक व्यक्तीसाठी काम हा सिद्धांत संघाचा मूलभूत संस्कार आहे. संघस्थान हे संस्कारभूमी आहे. सर्वांत मूलभूत संस्कार म्हणजे पारिवारिक आत्मीयतेचा संस्कार, हाच संस्कार संघ सांगतो.

याच संदर्भात पू. गुरुजींना (माधव सदाशिव गोलवलकर) राजगोपालाचारी यांनी विचारले होते –

What is your constitution? What type of organization is it? Is it political, social or a trade union?

त्यावर श्रीगुरुजींनी उत्तर दिले –

आमचा तर हिंदू पारिवारिक संगठन आहे. फरक आहे तो केवळ अंशात्मक, गुणात्मक नाही! Ours is a Hindu family

organization, the difference lies not in type but in degree.

याच भारतीय तत्त्वाला अनुसरून 'वसुधैव कुटुंबकम्' चे पायीक संघाचे स्वयंसेवक आहेत.

संघाच्या दृष्टीने कार्यकर्ता हा केंद्रबिंदू आहे. कार्यकर्त्याच्या शुद्ध चारित्र्यामुळेच संघकार्य फुलते. त्याचे अधिष्ठान म्हणजे ध्येयाशी निष्ठा, शिस्त, निःस्वार्थ वृत्ती आणि समाजाशी एकरूप होण्याची तयारी. संघ हा व्यक्तिपूजक नाही; तो ध्येयपूजक आहे, राष्ट्रपूजक आहे. त्यामुळे स्वयंसेवक मोह किंवा भीतीमुळे विचलित होत नाहीत.

'न तन्तोष्चतार्थावान्निरमत्कान्त धीराः' या श्लोकाप्रमाणे कार्य संपूर्ण पूर्णत्वास जाण्यापर्यंत कार्यकर्ता थांबत नाही. कारण संघाने आपले ध्येय निश्चित केले आहे. आणि त्यामुळेच ध्येयशील संघकार्यकर्ते हातात घेतलेले कार्य पूर्ण करतातच. याचे अनेक उदाहरण संघ इतिहासात आपल्याला वाचायला मिळतील.

ही ध्येयशीलता आजही कार्यकर्त्यांमध्ये कायम आहे आणि त्याचा कुठेही विसर संघ स्वयंसेवकांना पडलेला नाही. १९२५ साली पू. डॉक्टरांनी सांगितलेल्या ध्येयपथावर एक एक पाऊल संघ अग्रेसर होत आहे.

संघ आणि समाज हे वेगळे नाहीत. समाजाची शक्ती म्हणजेच संघशक्ती. म्हणूनच स्वयंसेवकांनी 'मै नहीं, तू ही' हा भाव अंगीकारला आहे. अहंकाररहित, संवादशील, समजूतदार वर्तनामुळे गेल्या शतकभर संघकार्य दृढ होत गेले आहे.

या शताब्दी वर्षात संघाला कार्यकर्त्यांच्या रूपाने अनेक कर्मवीर, ध्येयनिष्ठ प्रचारक लाभले. त्यांनी केलेला त्याग आणि मेहनत स्मरणीय राहणार आहे. संघाने अनेक समाजपुरुष घडवले, परंतु त्यांचे नाव कुठे दिसत नसले तरी त्यांच्या कार्याची प्रचीती प्रत्येक संघकार्यकर्त्याला संघाच्या प्रवासादरम्यान मिळत असते. संघ व्यक्तिकेंद्रित नाही. संघाने नेहमीच एक मंत्र जोपासला आहे 'राष्ट्राय स्वाहा, इदं राष्ट्राय, इदं न मम.'

संघाची उपलब्धी काय? असा प्रश्न विचारला तर उत्तर स्पष्ट आहे संघाने कोणतीही उपलब्धी आपली मानली नाही. हिंदू समाजासाठी केलेले कार्य म्हणजे आपले समाजाप्रती कर्तव्य. त्यामुळे संघाची १०० वर्षाची गाथा ही समाजाची केलेली कर्तव्यसेवा आहे.

गीतेच्या श्लोकाप्रमाणे – 'तेन त्यक्तेन भुंजीथा – स्वयंसेवकांनी त्यागातूनच खरा आनंद घेतला. मोहात न अडकता, ध्रुवताऱ्यासारखे अटल राहून त्यांनी मातृभूमीची सेवा केली.'

संघ दुरून कळत नाही, आणि खरं तर संघ कुणाला पूर्ण कळला नाही. ही दैविक संघटनशक्ती आहे जी प्रत्येक कार्यकर्त्याकडे आत्मीयतेने पाहते. संघ शाखा हेच संघाचे बीज आहे, तर ध्येय हेच दैवत आहे.


शतकभर त्याग, समर्पण, निष्ठा आणि सेवेच्या आधारावर संघ शताब्दी साजरी करीत आहे. व्यक्तिनिर्माणातून राष्ट्रनिर्माण हे अखंड कार्य सुरूच राहणार आहे, जोपर्यंत समाज आणि संघ पूर्णतः एकरूप होत नाहीत. संघाला हिंदू समाजाला जागृत स्थितप्रज्ञ अवस्थेत घेऊन जायचे आहे.

आज हा संघ शताब्दीचा लेख लिहिताना मनाला परमसुख मिळत आहे, भाव ओसंडून वाहत आहेत, आणि एक संघ स्वयंसेवक म्हणून गर्वाची अनुभूती सुद्धा होत आहे. शेवटी पू. गुरुजींचे शेवटच्या क्षणी उच्चारलेले प्रेरणादायी शब्द आठवतात 'आता यानंतर, विजयच विजय आहे.'

आणि खरोखरच – आता संघाचा विजयच विजय आहे!
संघ शतायु झाला आहे! संघ शतायु झाला आहे!
तेरा तुझको अर्पण! माँ भारती!

**ॲड. संकेत राव**

◈ ◈ ◈



# त्रिपुरी पौर्णिमा - उत्सव दिव्यांचा!

सनातन धर्मात जे जे सण – उत्सव साजरे केले जातात त्यांना धार्मिक महत्त्व तर असतेच शिवाय विविध पंथ जाती यांना देखील जोडून ठेवण्याचे काम ते करतात त्यामुळे भारतीय संस्कृती हे एकात्मतेचं प्रतीक मानलं जाते.

त्रिपुरी पौर्णिमा अर्थात त्रिपुरारी पौर्णिमा हा देखील असाच एक उत्सव जो तिमिरातून तेजाकडे घेऊन जातो कारण तो दिवाळी प्रमाणेच दिव्यांची आरास करून साजरा केला जातो. हिंदू धर्माप्रमाणे त्रिपुरारी पौर्णिमेला शिवमंदिरात त्रिपूर वात लावली जाते. तसेच घरोघरी, अंगणात देखील दिव्यांची आरास केली जाते. देशभरातील मंदिरात विविध दिवे लावले जातात. अनेक गड–किल्ल्यांवर त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त घाट, गड –किल्ले दिव्यांनी सजवले जातात अगदी नानाविध प्रकारच्या रांगोळीसुद्धा दिव्यांच्या रोषणाईने काढली जाते.

कार्तिक पौर्णिमेला देशभरातील विविध भागांमध्ये जत्रा भरतात. पवित्र नद्यांमध्ये स्नान केले जाते. यानंतर लक्ष्मी नारायणाचे पूजन करून तुपाचा दिवा लावला जातो.

- **त्रिपुरी पौर्णिमेचे धार्मिक महत्त्व:**

१) कार्तिक पौर्णिमेला मुख्यत्वे करून कार्तिकेय स्वामी यांचे पूजन केले जाते. कार्तिकेय स्वामी हे दक्षिण दिशेचे स्वामी आहेत असे मानले जाते. कार्तिक स्वामींचे दर्शन या दिवशी शुभ मानले जाते. या दिवशी दिपदान देखील केले जाते. आपल्यामुळे दुसऱ्यांच्या आयुष्यातील अंधार दूर व्हावा असा याचा उद्देश आहे. तसेच फक्त त्रिपुरी पौर्णिमेला महिला कार्तिकेय स्वामींचे मंदिरात दर्शन घेऊ शकतात असा संकेत रूढ आहे.तसेच तुळशी विवाहाची सांगता देखील त्रिपुरारी पौर्णिमेला होते.

२) त्रिपुरी पौर्णिमेला हरिहर भेट असेही म्हणतात म्हणजेच या दिवशी शिव आणि विष्णूची भेट होते. याचे कारण असे की, एकदा शंभोमहादेव विष्णुकडे येवून त्यांच्याकडे सगळा कारभार सोपवतात आणि कैलास पर्वतावर तपस्येसाठी निघून जातात. या दिवशी विष्णूची सहस्त्र नावे घेवून बेल आणि महादेवांना रुद्र म्हणत तुळशीची पाने अर्पण केली जातात अशी प्रथा आहे. इतरवेळी आपण शंकराला बेल आणि विष्णूला तुळस वाहतो. अनेक घरांमध्ये विधीवत ही पूजा केली जाते.

३) कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी मन: शांतीसाठी चंद्राला दुधाचे अर्घ्य अर्पण केले जाते.

४) बौद्ध धर्मात असे मानले जाते की, कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी तथागत बुद्धांचे एक पट्टशिष्य धम्म सेनापती सारिपुत्राचे परिनिर्वाण झाले होते. या पौर्णिमेला बौद्ध धर्मीय स्त्री–पुरुष आठ शीलांचे पालन व उपोसथ व्रत करतात. सर्व लहान थोर उपासक–उपासिका एकत्र जमून बुद्ध वंदना घेऊन धम्म उपदेश ग्रहण करतात.

५) शीख धर्मातही या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. शीख धर्माचे संस्थापक गुरू नानकदेव यांची या दिवशी जयंती साजरी केली जाते.

कार्तिक पौर्णिमेचा दिवस हा त्रिपुरी किंवा त्रिपुरारी पौर्णिमा म्हणून ओळखला जाऊन तो साजरा करण्यामागे एक विशेष आख्यायिका सांगितली जाते ती अशी की : तारकासुरांच्या वधानंतर त्याच्या तीन दैत्य पुत्रांनी ब्रह्मदेवाला कठोर तपश्चर्या करून प्रसन्न केले. थोरला तारकाक्ष, मधला विद्युन्माली आणि धाकटा कमलाक्षने ब्रह्मदेव प्रसन्न झाल्यावर त्यांच्याकडून अढळ अशा तीन अद्भुत स्थानांचा वर मागून घेतला. ही तीन स्थानं 'त्रिपुरे' म्हणून ओळखली जायची. त्रिपुरे म्हणजे तीन शहरे, जी आकाशातून फिरणारी असावीत. हजारो वर्षांनी ही शहरे एका ठिकाणी यावीत. त्या वेळी, मध्यान्ह समयी, अभिजीत मुहूर्तावर आणि चंद्र – पुष्य नक्षत्रावर असताना आणि आकाशातून पुष्करावर्त नावाच्या नीलमेघांची छाया पडलेली असताना जर कोणी असंभव स्थानातून एकाच बाणाने तीनही पुरांना बाण मारला तरच ती जळून नष्ट व्हावी, नाहीतर ती कधीही नष्ट होऊ

नयेत!' असा वर त्यांनी ब्रह्मदेवांकडे मागितला होता. या त्रिपुरासुरांनी तिन्ही लोकांत हाःहाःकार माजवला. देवांनी मदतीसाठी शंकराचा धावा केला आणि महादेवांनी असंभव गोष्ट संभव करून एका बाणात त्रिपुरी भस्म करून टाकली असे सांगितले जाते. काही पौराणिक कथांनुसार, श्रीविष्णूंनी याच दिवशी प्रथम अवतार धारण केला होता, असे मानले जाते. मत्स्य अवतार हा विष्णूच्या दशावतारांपैकी पहिला अवतार मानला जातो. या अवतारांमध्ये भगवान विष्णूंनी माशाचे रूप घेतले होते. पुराणांनुसार भगवान विष्णूंनी पृथ्वीला प्रलयापासून वाचवण्यासाठी मत्स्यावतार घेतला होता. अठरा पुराणांमध्ये मत्स्यपुराणाचा समावेश आहे. श्रीविष्णूंनी मत्स्यावतारात राजा सत्यव्रताला तत्वज्ञानाचा उपदेश दिला, तो पुढे मत्स्यपुराण म्हणून प्रसिद्ध झाला, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते. लोकांनी दीपोत्सव करून त्रिपूरसंहाराचा आनंद व्यक्त केला.

त्रिपुरी पौर्णिमेला दिप पूजन व दिवे लावण्याचे खूप महत्त्व आहे. त्रिपुरारी पौर्णिमेला जो दिवा लावतात त्याला खास वात तयार केली जाते. त्यास त्रिपूर वात असे म्हणतात व ती शिवमंदिरात व घरोघरी मोठ्या भक्ती भावाने लावली जाते. काहीजण १०५ वातींचा दिवा लावतात तर काही जण ७०० वातींचा दिवा लावतात. एवढी मोठी वात लावण्यामागे कारण त्रिपुरासुराच्या वाईट वृत्तीचे दहन व्हावे असा आहे. कापसाचे सूत काढून ती वात केली जाते त्याची एक खास पद्धत आहे. पणतीमध्ये ही वात ठेवून तुपात ही वात प्रज्वलित केली जाते. देवस्थानातील दगडी दीपमाळाही या दिवशी उजळवल्या जातात



व नदीच्या पात्रात प्रज्वलित दीप सोडतात. त्रिपुरांतक रूपातील शिवाची सुंदर शिल्पे भारतात अनेक ठिकाणी आहेत. 'त्रिपुरज्वलनव्रत' या नावाचे एक व्रत या दिवशी करण्याची प्रथा काही ठिकाणी आहे. या व्रतात शिवापुढे त्रिपुर वाती लावणे, दीपपात्रे दान देणे, शिवाची पूजा करणे आदि केले जाते.

दीप पूजन व प्रज्वलन केल्याने वातावरणात एक प्रकारची सकारात्मक ऊर्जा निर्माण होते म्हणूनच आपण कोणत्याही पूजा, विधी किंवा कार्यक्रमापूर्वी दीप प्रज्वलन करतो. आपल्या आजूबाजूला असणाऱ्या नकारात्मक गोष्टींना दूर करून नव्याने नवचेतना निर्माण करण्याचे कार्य दीप करतात. त्रिपुरसुरासारखा अनर्थ माजवणाऱ्या कोरोना विषाणूच्या काळात ही सगळ्यांच्या मनातील भीती व नकारात्मक भावना दूर करण्यासाठी जणू आपले पंतप्रधान मा. मोदीजींनी सगळ्यां भारतीयांना घरोघरी दिवे लावण्याचे आवाहन केले होते. दिव्यांचा मंद प्रकाश आपल्याला मानसिक आनंद, समाधान आणि प्रसन्नता प्रदान करतो. त्यामुळे आपल्या सनातनी संस्कृतीत त्रिपुरारी पौर्णिमेला अनन्य साधारण महत्त्व आहे.

त्रिपूरी पौर्णिमेला दिव्यांनी उजळू दे आकाश
सर्वत्र पसरू दे सकारात्मकतेचा लख्ख प्रकाश!!

**ॲड. स्वाती जेरे**

◈ ◈ ◈



# होय! अहिल्यानगर जिल्ह्याने हिंदुत्व विचारधारा स्वीकारली आहे!

पुन्हा एकदा राज्याच्या (अ) जाणत्या राजाने, नेत्याने नगर जिल्ह्याबद्दलची (म) तळमळ व्यक्त केली आहे. निमित्त पुन्हा कडू पाटलांच्या कार्यक्रमाचं.

स्थळ सहकार सभागृहच! बरोबर हीच खंत २०१४ च्या दरम्यान ह्याच ठिकाणी त्यांनी व्यक्त केली होती. त्यावेळी आम्ही त्यांना एक अनावृत्त पत्र लिहून त्यांच्या शंकांचे निरसन पण केले होते. त्यांच्या ह्या खंत व्यक्त करण्यातून ह्या अहिल्यानगर मधील ह्या सकारात्मक परिवर्तनाचे जे वाहक होते, जबाबदार अनामिक कार्यकर्ते होते त्यांच्या बद्दल लिहिले होते. त्याचे परीसवेध नावाचे पुस्तक झाले. योगायोगाने ह्याच पुस्तकाची तिसरी विस्तारित आवृत्ती २६ सप्टेंबर तारखेला प्रकाशित होत आहे.

कोणे एके काळी साम्यवादी, समाजवादी असलेला हा अहिल्यानगर जिल्हा त्यात आता भाजप, आर. एस. एस. चे विचार रुजत आहेत हे चांगले नाही ही त्यांची खंत आहे. अर्थात हा विचार रुजत असताना जे राजकीय लाभार्थी बनले त्यातले काही तेथे उपस्थित पण होते पण त्यांची हे मान्य करण्याची हिंमत होणार नाही. आम्ही त्यांची अडचण समजू शकतो.

ह्या बदललेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील सामाजिक आणि राजकीय विचाराची वाट धरून आज सत्तेच्या परिघाच्या जवळ वावरणाऱ्या राजकीय घराण्याचे तेथे उपस्थित असणाऱ्या प्रतिनिधींनी पवार ह्यांच्या ह्या खंत व्यक्त करण्याबद्दल व्यक्त होणे गरजेचे आहे. अर्थात ते हे धाडस दाखवतील की नाही माहीत नाही.

संघाची तर धारणा स्पष्ट आहे. संघाला सर्वांनाच संघाच्या म्हणजेच सनातन हिंदू विचाराच्या जवळ आणायचे आहे. संघ नेहमी राष्ट्र/समाज सर्वतोपरी हा एकच विचार घेऊन काम करणारी संघटना आहे. अहिल्यानगर वासियांनी ह्या विचाराबरोबर म्हणजेच राष्ट्रीय विचाराबरोबर राहण्याचा निर्णय घेतला आहे त्याने कुणाचे राजकीय नुकसान होणार असेल तर त्यांनी ते ठरवावे, समाजाला दोष देऊ नये.

ज्या साम्यवादी विचाराबद्दल हे महोदय बोलत होते त्यातील एका साम्यवादी विचाराच्या नेत्याचा मुलगा आज हिंदुत्वाचा आधार घेऊन आमदार झाला आहे.

भाजपाचा तो जिल्हाध्यक्ष पण झाला होता. अर्थात ते तत्वनिष्ठ साम्यवादी होते. दुसरे शेजारील तालुक्यातील कम्युनिस्ट नेत्याची पुढील पिढी अनेक वर्षापासून हिंदुत्वाच्या विचाराबरोबर आहेत आणि प्रामाणिक पणे काम करत आहेत.

आर. एस.एस.च्या विचार रुजत असल्याबद्दल चिंता व्यक्त करताना साम्यवादी मंडळीनी काँग्रेस मध्ये घुसून सत्तेचे सुख कसे मिळवले? ह्याबद्दल काळजी किंवा खंत ह्या नेत्याला कधी वाटली नाही. सहकाराचे तत्व स्वीकारताना त्यातून अहिल्यानगर जिल्ह्यातील साखर सम्राट, सहकार सम्राट, शिक्षण सम्राट तयार करणे म्हणजे साम्यवादी विचार आहे का? सर्वसामान्यांचा प्रतिनिधी आमदार होणे हे दुःख आहे का ह्या नेत्यांचे?

पाथर्डी तालुक्यातील कट्टर कम्युनिस्ट असणाऱ्या गावात जलसंधारणाचे जाळे विणणारे संघाचे सेवाभावी कार्यकर्ते आहेत. हे शेतकऱ्यांचे नेते म्हणणाऱ्या ह्या महाशयांनी समजून घ्यायला हवे. त्या गावात संघाचे कार्यकर्ते गेल्यावर काही वयस्कर मंडळी भेटायला आली आणि कबूल करत म्हणाली इतके वर्षे डाव्या चळवळीत घालवली पण एक थेंब आमच्या गावात आणू शकलो नाही. पुढे ते म्हणाले आम्ही धर्म नाकारला आणि त्यामुळेच आमचा पराभव झाला. समाजाची नाडी आम्ही ओळखू शकलो नाही अशी कबुली त्या प्रामाणिक साम्यवाद्याने दिली.

पुणतांबा ह्या गावात एकच साम्यवादी पुढारी होते. सगळे गाव त्याला कॉम्रेड म्हणायचे. त्याचे सख्खे भाऊ पण कॉम्रेड नव्हते स्वयंसेवक होते. जेंव्हा ते निधन पावले तेंव्हा सन्मानाने त्यांचे अंत्यसंस्कार करणारे स्वयंसेवकच होते आणि ह्या नेत्याच्या भाषेत आर एस एस, भाजप कार्यकर्ते होते. हा दैव दुर्विलास समजून घेण्याची गरज आहे. साम्यवादी आणि समाजवादी नेते ह्यांना अनुयायी मिळवता आले नाही कारण बोले तैसा चाले हे अभावानेच होते. (कॉ. लंघे, कॉ. काकडे, कॉ. कडू सन्मानीय अपवाद)

साम्यवाद म्हणजे विशिष्ट जातींचा द्वेष हा प्रकार अहिल्यानगर जिल्ह्यात ज्यांनी सुरू केला तो सर्वसामान्य समाजाला मानवलेला नाही हे इथे लक्षात घ्यावे लागले.

साम्यवादाचा नावाखाली स्वतःची राजकीय कारकीर्द भरभराटीला आणत काही संस्था, संघटना, जाती ह्यांचा बागुलबुवा उभा करून जनतेची फसवणूक केल्याने हे लोकांच्या जेंव्हा हे लक्षात आले तेव्हा अहिल्यानगर जिल्ह्यातला साम्यवाद संपला !

समाजवाद सुरुवातीला पटवर्धन बंधूंच्या रूपाने आकाराला आला. त्यातील अच्युतराव हे तर पुढे भारत रत्न नानाजी देशमुख ह्यांचे जवळचे मित्र झाले. नवलमल फिरोदिया हे काँग्रेस चळवळीत वाढले. मोतीलालजी फिरोदिया खासदार होते. पण पुढे नवलमलजी ह्यांना पण नानाजी ह्यांच्या रूपाने संघ विचार, आचार समजल्यावर त्यांच्या संघ विषयक धारणा बदलल्या.

तिकडे कोपरगाव, श्रीरामपूर भागात पवार बंधू समाजवादाची गादी चालवत होते. म्हणजे काय तर आपल्या गुंडगिरीवर साखर कामगार युनियन चालवून समाजवादी पक्ष चालवत होते. पुढील काळात जेव्हा ऊस कमी पडायला लागला तेव्हा खासगी कारखाने आणि शेतीमहामंडळे बंद करण्याचे पाप ह्या दोघा भावांनी केले. अनेकांचे संसार रस्त्यावर आले. संघ स्वयंसेवकांना मानसिक त्रास, जाच ह्या मंडळीनी दिला.

संगमनेर कॉलेज मध्ये एकेकाळी ह्याच लोकांचे साम्राज्य असल्याच्या थाटात ह्या लोकांनी संघ कार्यकर्त्यांना आपल्या आपल्या शिक्षणसंस्थात अनेक ठिकाणी छळले. पण द्वेषाचे राजकारण फार काळ चालत नाही. त्याचा कधी तरी अंत असतो हे लक्षात ठेवावे लागेल.

साम्यवादी, समाजवादी विचार नाही तर पवारवादी विचार अहिल्यानगर जिल्ह्यात नाकारला जातो आहे ही खरी खंत आहे. हा महाराष्ट्र हा पवारवादी विचार अनेक वर्षापासून पाहत आला आहे. ह्या विचारात नाव फुले, शाहू ,आंबेडकर ह्यांचे पण काम जाती जातीत भांडणे लावायचे . नाव धर्म निरपेक्षतेचे पण काम मुस्लिम अनुनयाचे. ते ही परिस्थितीनुसार! असिर हे मुस्लिम उमेदवार काँग्रेस कडून नगर शहरात लढत असताना हिंदूंची मते मिळवण्यासाठी ह्यांचे अनुयायी हिंदुत्ववादी झाले होते. संघ कार्यालयाचे आणि संघ कार्यकर्त्यांचे उंबरे झिजवत होते. स्वतः आपल्याला पाहिले मुख्यमंत्रीपद मिळवताना ह्यांनी जनसंघाचा पाठिंबा घेतला तेंव्हा जनसंघाचा विचार तोच होता जो आज आहे. तेव्हा उत्तमराव पाटील, हशू अडवाणी चालले मग आता असे काय झाले?

केवळ अहिल्या नगर नाही तर पूर्ण महाराष्ट्रात अराजक निर्माण करणारे विचार हे छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार करणाऱ्या लोकांनी, तरुणांनी झुगारून दिले आहेत आणि त्यामुळेच अहिल्यानगर जिल्हा सुध्दा साम्यवाद, समाजवाद, पवार वाद ह्या पासून लांब गेला आहे.

शुद्ध बीजा पोटी फळे रसाळ गोमटी! ह्या उक्ति प्रमाणे संघाचे विचार शुद्ध असल्याने त्या वृक्षाला रसाळ फळे येणे स्वाभाविक होते. ह्या शुद्ध विचारासाठी अनेक शुद्ध व्यक्तिमत्वे येथे जन्माला आली. त्यांनी अनेक आपदा, द्वेष, सूडभावना विषा सारख्या सहन केल्या पण समाजाप्रती अमृतरसाचे वितरण हे कार्यकर्ते करत राहिले. ना त्यांना पद मिळाले, पैसे मिळाले, ना प्रतिष्ठा मिळाली आणि नाही कीर्ती मिळाली. मिळाली नोकरीतील अस्थिरता, व्यवसायात विरोध आणि समाजात कुचेष्टा!

हे कोण अनाम वीर होते? काय त्यांची नावे होती? पवारांच्या सारख्यांना समजण्यासाठी काय त्यांची जात होती? त्यांनी आपले नाव पुसले होते. त्यांनी आपली जात सोडली होती. त्यांनी सारा हिंदू समाज परिवार मानताना स्वतःचा परिवार अत्यंत कठोर परीक्षेसाठी सिद्ध केला होता म्हणून आर. एस.एस. चा विचार समाजात रुजला आणि यशस्वी झाला. अशा व्यक्तिमत्वाची माहिती आमच्या परीसवेध पुस्तकात नक्की वाचता येईल. खंत व्यक्त करण्यापेक्षा आणि अस्वस्थ होण्यापेक्षा असे दहा तरी निस्वार्थी माणसे उभी करा! कदाचित पुन्हा काही प्रमाणात तुम्हाला स्वीकारेल ही!

अशी निस्वार्थी माणसे उभी करणे हे साखर कारखाने, शिक्षण संस्था चालवण्यापेक्षा खूप अवघड आहे. दुसऱ्यांनी उभ्या केलेल्या संस्था ताब्यात घेण्यापेक्षा खूपच कठीण आहे. माणसांना प्रलोभने दाखवून आपल्या बाजूने वळवण्या इतके सोपे अजिबात नाही.. जातींचा अभिमान जागृत करून त्यावर आपली स्वार्थाची पोळी भाजणे किंवा दुसऱ्या जातीचा विद्वेष शिकवणे हे व्यक्तिनिर्माणाच्या कार्यापेक्षा खूप सोपे आहे.

त्यामुळे कठीण कार्याची तयारी असेल तर पुन्हा नगर जिल्हा तुमच्या बरोबर येईल पण तूर्त तरी काही वाव आहे असे वाटत नाही. अहिल्या नगर जिल्हा योग्य दिशेने वाटचाल करत आहे आणि त्या जिल्ह्यातील हिंदू समाज आग्रहाने सांगत आहे होय आम्ही हिंदुत्वाचा विचार स्वीकारला आहे.

**रवींद्र मुळे**

# म. गांधीजींची संघ शाखेला भेट संघाचे केलेले कौतुक

- **... तर सगळ्या देशाचा पाकिस्तान झाला असता. डॉ. भगवानदास**

मुस्लिम लीगच्या गुंडांनी स्वातंत्र्यानंतर दिल्लीत कशी बंडाळी केली होती आणि स्वयंसेवकांचा ती मोडून काढण्यात कसा सहभाग होता हे आपण मागील प्रकरणात पाहिले. दिल्लीच्या स्वयंसेवकांनी पार पडलेल्या देशभक्तिपूर्ण शानदार कार्यावर भगवानदास यांनी प्रकाश टाकला आहे. (पहिला भारतरत्न हा पुरस्कार त्यांनाच मिळाला होता.) १६ ऑक्टोबर १९४८या दिवशी त्यांनी एक वक्तव्य दिले,

मला विश्वसनीय सूत्रांकडून अशी माहिती मिळाली आहे की, दिल्लीमध्ये लीगी मुसलमानांचा विश्वास प्राप्त करून घेण्यासाठी अनेक स्वयंसेवकांनी मुसलमान धर्म स्वीकारला होता. त्या माध्यमातूनच ते लीगी षड्यंत्राचा भेद करू शकले. व योग्य वेळी सरदार वल्लभभाई पटेल यांना त्यांनी या विद्रोहाची माहिती पोचविली. ते पुढे म्हणतात,

१० सप्टेंबर १९४७ या दिवशी एक मोठा सशस्त्र उठाव करून केंद्र सरकारमधील सर्व वरिष्ठ मंत्री व वरिष्ठ अधिकाऱ्यांची हत्या करायची, मोठ्या प्रमाणावर हिंदूंचा संहार करायचा, लाल किल्ल्यावर पाकिस्तानचे हिरवे निशाण फडकवायचे व त्यापाठोपाठ साऱ्या भारतावरच कब्जा करण्याची ही व्यापक योजना होती.

डॉ. भगवानदास पुढे आपल्या व्यक्तव्यात म्हणतात, अत्यंत श्रेष्ठ त्यागाची व आत्मबलिदान यांची सिद्धता असलेल्या या युवकांनी वेळेवर नेहरू व सरदार पटेल यांना या संबंधाने सूचना दिली नसती तर, सध्याच्या सरकारचे नामोनिशाणदेखील शिल्लक राहिले नसते. सगळ्या देशाचा पाकिस्तान झाला असता. कोट्यवधी हिंदूंचा संहार झाला असता. जे शिल्लक राहिले असते त्यांना बळजबरीने मुसलमानच बनावे लागले असते किंवा गुलाम म्हणून जगावे लागले असते.

डॉ. भगवानदास यांनी हे वक्तव्य तेव्हा दिले होते, जेव्हा पं. जवाहरलाल नेहरूंनी म. गांधी हत्येच्या प्रकरणात सूडबुद्धीने व खोटेपणाने अडकवून संघावर बंदी घातली होती.

- **मुस्लीम पाकिस्तानात जातील याचीच पं. नेहरूंना चिंता**

इंग्रजांच्या कारकीर्दीत नोव्हेंबर १९४५मध्ये केंद्रीय विधिमंडळाच्या (आजच्या संसदेशी समकक्ष, परंतु अत्यंत कमी अधिकार असलेली संसद) निवडणुका झाल्या होत्या. तर जानेवारी १९४६मध्ये प्रांतिक विधिमंडळाच्या (आजच्या विधानसभांशी समकक्ष, परंतु अत्यंत कमी अधिकार असलेल्या विधानसभा) निवडणुका झाल्या होत्या. उत्तर प्रदेशातील मुस्लिमांसाठी आरक्षित असलेल्या ६६ पैकी ५४ जागा मुस्लीम लीगने जिंकल्या होत्या. म्हणजे उत्तर प्रदेशातील बहुसंख्य मुसलमान पाकिस्तानवादीच होते. यातील लाखो स्वतःच त्यांच्या स्वप्नातील स्वर्गतुल्य देशात, म्हणजे पाकिस्तानात पलायन करत होते. तर पाकिस्तानातून क्रूरपणे हुसकावून लावल्याने भारतात लाखो हिंदू निर्वासित होऊन आले होते. अशा निर्वासितांनी व येथील स्थानिक हिंदूंनीही काही हजार मुस्लीमांना पाकिस्तानात हुसकावून लावले होते. पंतप्रधान १२ पंडित नेहरूंनी १३ सप्टेंबर १९४७ला उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री गोविंद वल्लभ पंत यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले, मी आशा करतो की उत्तर प्रदेशातून मुस्लिमांचे पलायन होणार नाही. या पलायनाविषयी मी जितका अधिक विचार करतो, तितके हे मला भविष्यकाळासाठी धोकादायक वाटते. गांधीजीसुद्धा असेच मानतात. त्यांना पंजाबमधून होत असलेले पलायन सुद्धा पसंद नाही. म्हणजे पाकिस्तानवादी दिल्लीवर आक्रमण करत आहेत आणि ते भारतातच रहावेत यासाठी प्रयत्न चालू आहेत!

- **म. गांधीजींची संघ शाखेला भेट – संघाचे केले कौतुक**

स्वातंत्र्यानंतर लगेच म्हणजे सप्टेंबर १९४७मध्ये म.

गांधीजींनी श्रीगुरुजींना भेटण्याची इच्छा प्रकट केली. म. गांधीजींना संघाच्या वाढत असलेल्या शक्तीचा परिचय होता. म. गांधीजींची इच्छा समजतात श्रीगुरुजी ताबडतोब दिल्लीला येऊन बिर्ला भावनात त्यांना भेटले. या भेट–वार्तेत म. गांधीजींनी संघाच्या एखाद्या कार्यक्रमात येऊन स्वयंसेवकांना संबोधित करण्याची इच्छा श्रीगुरुजींनी प्रकट केली.

त्यानुसार नवी दिल्ली येथील भंगी कॉलनीत १६ सप्टेंबर १९४७ या दिवशी आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रॅलीत म. गांधीजींचे भाषण झाले. आपल्या भाषणात ते म्हणाले,

कित्येक वर्षांपूर्वी वर्धामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका शिबिरात मी गेलो होतो. त्यावेळी याचे संस्थापक श्री. हेडगेवार जिवंत होते. स्व. श्री. जमनालाल बजाज मला शिबिरात घेऊन गेले होते आणि तिथे मी या लोकांचे कडक अनुशासन, साधेपणा आणि स्पृश्य–अस्पृश्यतेचे संपूर्ण उच्चाटन बघून अत्यंत प्रभावित झालो होतो. तेव्हापासून संघाची खूप वाढ झाली आहे. मी नेहमीच हे मानत आलो आहे की, जी संस्था सेवा आणि आत्मत्यागाच्या आदर्शाने प्रेरित असते तिची ताकद वाढतेच; परंतु सत्य रूपात उपयोगी पडण्यासाठी त्यागभावनेच्या बरोबर ध्येयाची पवित्रता आणि खऱ्या ज्ञानाचे संयोजन आवश्यक आहे. असा त्याग, की ज्यामध्ये या दोन्ही गोष्टींचा अभाव आहे, तो समाजासाठी अनर्थकारी सिद्ध झाला आहे.

सुरुवातीला जी प्रार्थना गायली गेली तिच्यामध्ये भारतमाता, हिंदू संस्कृती आणि हिंदू धर्माची प्रशंसा आहे. मी असा दावा करतो की, मी सनातनी हिंदू आहे. मी सनातनचा मूळ अर्थ घेतो. हिंदू शब्दाचे खरे–खरे मूळ काय आहे हे कोणालाही माहीत नाही. हे नाव आम्हाला दुसऱ्यांनी दिले आणि आम्ही ते आपल्या स्वभावानुसार आपले बनवले. हिंदू धर्माने जगातील सर्व धर्मांच्या चांगल्या गोष्टी स्वीकारल्या आहेत आणि म्हणून या अर्थाने हा काही वर्जनशील धर्म नाहीये. म्हणून याचा इस्लाम धर्म किंवा त्याचे अनुयायी यांच्याबरोबर असा काही संघर्ष होऊ शकत नाही, जसा की आज दुर्भाग्यवश होत आहे. जेव्हापासून हिंदूधर्मात अस्पृश्यतेचे विष पसरले, तेव्हापासून त्याचे पतन सुरू झाले. एक गोष्ट निश्चित आहे आणि ती गोष्ट मी जोरदारपणे सांगत आलो आहे, ती म्हणजे, जर अस्पृश्यता टिकून राहील तर हिंदू धर्म नष्ट होईल. त्याचप्रमाणे जर हिंदू असे समजतील की हिंदुस्थानात हिंदूंच्या शिवाय अन्य कुणासाठी जागा नाही आणि जर गैर–हिंदू, विशेषकरुन मुसलमान, येथे राहू इच्छित असतील तर त्यांना हिंदूंचे गुलाम बनून राहावे लागेल, तर ते हिंदू धर्माचा नाश करतील आणि अशाच प्रकारे, जर पाकिस्तान असे मानू लागला की, तेथे फक्त मुसलमानांसाठीच जागा आहे आणि गैर–मुस्लिमांना तेथे गुलाम बनून राहावे लागेल तर, त्यामुळे हिंदुस्थानातून मुसलमानांचे नामोनिशाण पुसले जाईल.

- **प्रधानमंत्री पंडित नेहरूंची उलटी प्रतिक्रिया १६**

जातीय दंग्यांना शीख व हिंदूच अधिक जबाबदार होते, असा अर्थ पं. नेहरूंच्या भाषणातून अनेक वेळा ध्वनित होत असे. ३० सप्टेंबर १९४७च्या भाषणात पं. नेहरू म्हणाले, मी नेहमी परदेशी जातो व तिथल्या लोकांच्या संपर्कात असतो. परंतु आता तसे करणे मला जड जाते, कारण भारताचे नाव धुळीला मिळाले आहे. परकीय देशांचे प्रतिनिधी जेव्हा माझ्या भेटीला येतात तेव्हा मी अस्वस्थ होतो. दिल्ली व इतर ठिकाणी जे घडले त्यानंतर त्यांच्यासमोर मी ताठ मानेने कसा वावरू? म्हणजे बघा, दंगे करत होते मुस्लीम लीगचे गुंडे, मरत होते हिंदू, पण पं. नेहरूंना ताठ मानेने सांगता येत नव्हते की, हे काम मुस्लीम लीगचे गुंडे करत आहेत!

- **निर्वासितांची कत्तल : मृदुला साराभाई यांचे पत्र १**

स्वातंत्र्य मिळाले म्हणजे सर्व काही छान चालले होते असे नाही. उलट दिवसेनदिवस परिस्थिती बिघडतच चालली होती. मृदुला साराभाई यांनी असे कळविले होते की, निर्वासितांना नेणारी एक गाडी रुळांवरून घसरवून तिच्यावर २३ सप्टेंबर १९४७ला झालेल्या हल्ल्यात दोन हजार ठार व एक हजार जखमी झाले. त्यापैकी ५०० जणांना शस्त्रक्रिया केल्याप्रमाणे कापण्यात आले होते. अर्थात हे सर्व हिंदु व शीख होते हे सांगायला नको.

- **२९ सप्टेंबर १९४७ चा गुप्तहेर विभागाचा अहवाल**

जो पंजाब पाकिस्तानात गेला (पश्चिम पंजाब) त्याची तुलना हिंदूंच्या दृष्टीने केवळ नरकाशीच होऊ शकत होती. गुप्तहेर विभागाचे उपसंचालक सिन्हा यांनी २९ सप्टेंबर १९४७च्या अहवालात पश्चिम पंजाबचे फार गंभीर चित्र रेखाटले होते. त्यात

म्हटले होते की, संपूर्ण पश्चिम पंजाबमध्ये कोठेही कायद्याचे राज्य अस्तित्वात असल्याची चिन्हे नव्हती व दंडाधिकारी आणि पोलीस देखील मुसलमानेतरांवर निघून जाण्याची सक्ती करत होते. पाकिस्तान सरकारचे सदस्य जे बोलले असता जगात बरे दिसेल, ते वरवर बोलत होते; पण प्रत्यक्षात मुल्ला आणि इतर धार्मिक नेत्यांना व जनतेला जे हवे होते तेच गुप्तपणे करत होते. २५ सप्टेंबर १९४७पर्यंत सुमारे १ लाख ९८ हजार मुसलमानेतर (हिंदू अधिक शीख) ठार करण्यात आले होते. १ लाख लोकांना सक्तीने मुसलमान करण्यात आले होते; १२ हजार स्त्रियांचे अपहरण करण्यात आले होते. अजून सुमारे १० लाख मुसलमानेतरांची भारतात स्थलांतर करण्याची इच्छा आहे.

- **अहिंसेचे आत्मघातकी रसायन**

या पृष्ठभूमीवर दिल्लीतील २३ सप्टेंबर १९४७च्या प्रार्थनेनंतरच्या प्रवचनात म. गांधीजी म्हणाले, रावळपिंडीहून आलेले जे थोडे लोक आज मला भेटले ते खरोखरच मोठे शूर होते. व्यापार हा त्यांचा जीवनक्रम होता..... मी त्यांना सांगितले थंड राहा. शेवटी परमेश्वर मोठा आहे. देव नाही असे स्थानच नाही. देवाचे नाव घ्या. त्याचे ध्यान करा. सर्व काही सुरळीत होईल. पाकिस्तानात जे अद्याप राहिले आहेत त्या हिंदूंचे काय? असे त्यांनी मला विचारले. मी त्यांना विचारले, मुळात आधी तुम्हीच येथे का आलात? तुम्ही तिथेच का मेला नाहीत? आपण जेथे वाढलो ते स्थान आपण सोडू नये. आपल्याला क्रूरपणे वागविले तरीही सोडू नये किंवा आपण ठार मारले जात असलो तरी सोडू नये अशी माझी अद्यापी श्रद्धा आहे. लोक आपणाला मारणार असतील आपण सुखाने मरूया. पण देवाचे नाव ओठावर ठेवून आपण शूरासारखे मरूया..... आपले नातेवाईक जरी मारले गेले, आपली माणसे जरी मारली गेली तरी, कोणावर आपण क्रोध का करावा? ते मारले गेले तरी त्यांचा योग्य असाच अंत झाला. त्यांना सद्गती मिळाली हे आपण जाणले पाहिजे. आपणा सर्वांनाच परमेश्वर तसे घडवू दे. देवाने आपल्याला तसेच मरण द्यावे, देवाजवळ काही मागणे असेल तर ते हेच असावे..... मी त्या रावळपिंडीच्या रहिवाशांना सांगितले आणि तेच मी तुम्हालाही सांगेन की शीख आणि हिंदू निर्वासितांना जाऊन भेटा आणि त्यांना नम्रपणे सांगा की, सैन्य किंवा शिपाई यांचे साहाय्य न घेता तुम्ही पाकिस्तानात परत जा.

- **लोकसंख्येची अदलाबदल हेच समस्येचे अंतिम उत्तर आहे. जिन्ना १७**

कराची येथे ११ ऑक्टोबर १९४७ या दिवशी सेना आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांसमोर भाषण करताना पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल जिन्ना म्हणाले, प्रचंड प्रमाणावर लोकसंख्येची अदलाबदल हेच अल्पसंख्यांकांच्या समस्येचे अंतिम उत्तर आहे. हा विषय रक्तपिपासू घटकांवर न सोपवता शासनानेच हाती घ्यावा.

अशी सूचना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पूर्वीच केली होती. मात्र पं. नेहरूंनी अर्थातच ती धुडकावून लावली.

- **हरिसिंगांनी भारताकडे केली शस्त्रास्त्रांचीही मागणी**

सप्टेंबर १९४७च्या सुरुवातीलाच पाकिस्तानने काश्मीरमध्ये सशस्त्र घुसखोर पाठवून महाराज हरिसिंगांवर दबाव आणायला सुरुवात केली होती. जणू पुढील संघर्षाची जाणीव झाल्यामुळेच महाराजा हरिसिंग ९ यांनी सप्टेंबरमध्येच भारताकडे लष्करी शस्त्रास्त्रांचीही मागणी केली होती. टी देण्याचे आश्वासन तत्परतेने सरदार पटेलांनी जम्मू–काश्मीरचे पंतप्रधान मेहेरचंद महाजन यांना सप्टेंबरमध्येच दिले होते. १ ऑक्टोबरला काश्मीरचे उपपंतप्रधान बात्रा यांनी सरदारांना स्मरणपत्र पाठवले. तत्पूर्वीच सरदारांनी संरक्षण मंत्री बलदेव सिंग यांना पत्र पाठवून लेफ्टनंट जनरल काश्मीरसिंह कटोच यांना जम्मू–काश्मीर सैन्याचे सेनापती म्हणून पाठवावे असे सांगितले. पंतप्रधान पंडित नेहरुसुद्धा काश्मिरी मुसलमानांविषयी शाशंक होते. सरदारांना १९ सप्टेंबरला पाठवलेल्या पत्रात ते लिहितात, पाकिस्तानच्या आक्रमणास महाराजांचे सैन्य तोंड देऊ शकणार नाही. अशा वेळेस जर तेथील जनता महाराज व त्यांच्या सैन्याच्या विरुद्ध झाली तर परिस्थिती आटोक्याबाहेर जाईल. ज्याला आपण काश्मीर म्हणतो त्यात जम्मू, काश्मीरचे खोरे व लडाख यांचा समावेश होतो. काश्मीर खोऱ्यात ९० टक्के मुस्लीम; तर जम्मूत ३३ टक्के मुस्लीम लोकसंख्या होती. एकूण जम्मू–काश्मीर राज्यात मुस्लीम ६४ टक्के तर हिंदू ३६ टक्के होते, हे लक्षात घेतल्यास सेक्युलर नेहरूंनीही खरे काय ते ओळखले होते !

**डॉ. गिरीष आफळे**

# इतिहासातील पुराण आणि पुराणातील इतिहास
# लेखांक ९ - (लेखमाला समाप्ती)

मागील लेखापर्यंत २१ विचारप्रवर्तक मुद्दे मांडले होते. उर्वरित ६ मुद्दे देत आहे :–

२२) अगस्तींनी महावतार बाबाजींना क्रियायोगाचे आध्यात्मिक तंत्र व अमरत्वाचा संदेश प्रदान केला होता. अद्यापही तामिळनाडूत तिरूनेलवेली जिल्ह्यातील कोटराल्लम् धबधब्याजवळील एका अज्ञात आश्रमात सूक्ष्म रूपाने वास्तव्य करून आहेत असे म्हणतात. कूर्गजवळील तलकावेरी उगमाशेजारच्या उंच पठारावरील रम्य पर्वत वृक्षराजीत अगस्तींचा वास झाला होता. हे ठिकाण सुंदर आहे व तिथे मी दोनदा गेलो होतो. एखाद्या पुण्यवानास त्यांचे अचानक दर्शन घडू शकते. तात्पर्य : आपल्या व्यावहारिक जगातील उद्योग चालवतांना Corporate क्षेत्रात ज्या CEO, Executives, Management, Training, Succession Planning वगैरे संज्ञा तुम्ही ऐकता त्या विश्वचालनासाठी अब्जावधी वर्षांपासून प्रत्यक्षात वापरल्या जात होत्याच व आहेत. पण विश्वाचे व्यवस्थापन बिनचूक तथापि औद्योगिक व्यवस्थापन गारठलेले व दिवाळखोर दिसते हा विरोधाभास नाही का?

२३) बरेचसे ऋषीमुनी हे आपल्यापेक्षा उच्च दर्जाच्या इतर लोकातून म्हणजेच पृथ्वीबाहेरून आले होते. ते सर्व आयू, सिद्धी, शक्ती, विज्ञान, अध्यात्म यात आपल्याला कल्पना येणार नाही इतके श्रेष्ठ होते व आहेत. पतंजली मुनी हे नागलोकातून आले व त्यांनीच योग व कुंडलिनी ज्ञान आपणास दिले.

(२४) अब्जावधी वर्षांचा इतिहास लिहिण्याची क्षमता एका मेंदूत असणे अशक्य आहे ही आपली समजूत. पण तेराशे वर्षांपूर्वी गुणाढ्य सात लाख श्लोकांचे काव्य रचतो. केतकरांनी एकट्याने २३ खंडांचा ज्ञानकोश लिहिला. महादेवशास्त्री जोशी, श्रीराम कामत यांनी अनुक्रमे संस्कृती कोश व चरित्रकोश लिहिण्याचे प्रचंड काम एकट्याच्या बळावर केले. मग आपल्यापेक्षा श्रेष्ठ प्रजातीतील व परलोकाहून आलेले महादीर्घायू महात्मे पुराणे, भागवत यारखे प्रचंड ग्रंथ सहज लिहू शकले या आश्चर्य काय ?

२५) 'अक्षौहिणी' शब्द संख्यावाचक आहे. महाभारत युद्धात असंख्य प्रकारची अस्त्रे वापरली गेली ज्यामुळे सुमारे सव्वा कोटी सैन्य १८ दिवसात ठार झाले. उलट सध्याची अस्त्रे वापरून हे शक्य झालेले नाही. अमेरिकेच्या दोन अणुबॉम्बमुळे फक्त अडीच लाख मेले होते. म्हणजे ब्रह्मास्त्रासारखे तंत्रज्ञान आतापेक्षा कितीतरी पट श्रेष्ठ असणार. एकेका पौराणिक वीराची शक्ती सिद्धींच्या सहाय्याने लाखो पट असली पाहिजे.

२६) विद्युतवेगाने संचार, दूरदृष्टी, दूरसंदेशवहन, दिव्यदृष्टी, स्थापत्य, अप्रतिम कोरीवकामाची प्रचंड मंदिरे, परलोकप्रवास, पिरामिड, लोहस्तंभ, इन्का संस्कृतीचे अवशेष, अनाकलनीय मिश्रधातू, परलोकावरील जीवांचे अवशेष, याच मन्वंतरातील याच २८व्या महायुगातील लयाला गेलेल्या जुन्या संस्कृतीतील जीवांचे अवशेष, स्थापत्यातील विलक्षण गणिती व भौगोलिक तंत्रे, इच्छा करू ते देणारे कल्पवृक्ष, परलोकाहून आलेल्या तत्कालीन यानांचे अवशेष, महाभारतकालीन रथांचे अवशेष यांच्या सम्बंधी लाहिरी महाशय, श्री एम, योगानंद परमहंस, स्वामी राम, राम भोसले आदींनी प्रत्यक्ष घेतलेले अनुभव स्तिमित करतात. यातील अनेक गोष्टींचा आधुनिक वैज्ञानिकांना अद्याप उलगडा होत नाही हे विशेष. याचा अर्थ आपल्यापेक्षा जास्त प्रगत संस्कृती इथे अनंत काळापूर्वी होऊन लयास गेल्या असणार.

२७) हिमालयात व्यासमुनी काहींना भेटले आहेत. मार्कंडेयांनी काही वेळा अचानक कुणास दर्शन व आशीर्वाद दिले आहेत. सरस्वती, गंगा, गोदावरी, नर्मदा अशा पवित्र नद्यांचे पूर्वापार इतिहास उपलब्ध आहेत. श्री श्रीपादवल्लभ, रमण महर्षी, नृसिंहसरस्वती, स्वामी समर्थ, आद्य शंकराचार्य, नाथपंथी यांच्यासारख्या महान आत्म्यांचे अद्भुत जीवन समजून घ्या. खरं तर या प्रत्येकावर एक दीर्घलेख लिहावा लागेल. त्यांनी घेतलेल्या शिष्यांच्या परीक्षा वाचा. संत रामदास तर स्पष्ट सांगतात – जगात ज्ञान हे एकच आहे ते म्हणजे आत्मज्ञान! बाकी सारी कौशल्ये सदरात मोडतात. नेमके आपण या कौशल्यांनाच ज्ञान समजत आहोत. असो.

वरील सर्व विवेचनातून लेखमालेचे सार म्हणून मला जे सांगायचे आहे ते असे –

अ) भारताचा व ब्रह्मांडाचा इतिहास अब्जावधी वर्षांचा आहे. धूर्त कावेबाज ब्रिटिश, पाश्चात्य इतिहासकार, तथाकथित पुरोगामी, कम्युनिस्ट, समाजवादी व नास्तिक मंडळींनी तर 'भारताला इतिहासच नाही' इतकेच म्हणायचे बाकी ठेवले आहे.

ब) ब्रिटिशांनी पुराणांना (mythology) खोटे ठरवून 'myth' हा शब्द 'खोटेपणा, कपोलकल्पित, कल्पनाविलास' यास समानार्थी ठरवला. वस्तुतः पुराणे, भागवत आदी ग्रंथ हा इतिहास आहे. पाश्चात्यांनी व त्यांचे भारतातील देशी भाट यांनी इतिहासाची मोडतोड करून भारताचा भूतकाळ फक्त दीडदोन हजार वर्षांचा ठरवला.

क) कोणत्याही पौराणिक व गूढ गोष्टींना पृथ्वीसापेक्ष नियम लागू होत नाहीत.

ड) काळाची व्याख्या, कालमापन व 'काळ म्हणजे काय' याचे सध्याच्या वैज्ञानिकांना कोडे सुटणारच नाही.

इ) पृथ्वीअगोदर अनेक लोक निर्माण झाले व शेवटी आपला नंबर लागला. त्यामुळे इतर लोकातील प्रजातींना महाआयू कशी लाभू शकेल हा मूर्खपणाचा प्रश्न आहे. कारण सात्विकता, रजोगुण व तामसीपणा यांच्यातील सीमारेषा पृथ्वीमानव कधीच समजू शकणार नाही.

फ) सध्याच्या वैवस्वत मन्वंतरातील २८वे महायुग चालू आहे. त्यातील रामायण, महाभारत आदी युगांचाही थांगपत्ता अजून पूर्ण लागत नाही. मग अगोदरच्या २७ महायुगात होऊन गेलेल्या सत्य, त्रेता, द्वापार व कलियुग यांचा इतिहास केवळ दिव्यात्म्यांकडूनच कळू शकेल हे काय सांगायला हवे? आपल्यासारख्या क्षुद्र मानवाचे ते काम नाही.

ग) ज्यांना पाढे लाखापर्यंतच माहीत आहेत त्याच्यापेक्षा ज्यांचे पाढे खर्व – निखर्व अशा अनंतापर्यंत पोचले आहेत त्यांचा इतिहासच प्राचीन असणार.

पॉल ब्रंटनसारखा कडवा बुद्धीवादी, फ्रान्सिस यंगहजबंड, अलेक्झांड्रा नील, अनी बेझंट, लेडबीटर, डेव्हिड फ्रॉले, थोरो, फादर स्टीफन, कार्ल जुंग, सेव्हियर दांपत्य, सिस्टर निवेदिता, सिस्टर ख्रिस्तीन यांच्यासारख्या शेकडो पाश्चात्यांना भारतीय अध्यात्माचे अनुभव आले ज्यामुळे त्यांची त्यावरील निष्ठा कायम दृढ झाली. या सर्वांनी आपला बुद्धीवाद भारतीय शास्त्रांसमोर थिटा पडतो हे प्रांजळपणे मान्य केले. आता विचार करा की हे सारे कडवे विदेशी बुद्धिवादी अंतिम सत्याच्या शोधासाठी भारतीय भूमीत आले. डोळस अभ्यासानंतर इथली अज्ञात शक्ती, ज्ञान व महान परंपरेसमोर नतमस्तक झाले. या उलट बाटगा कडवा असतो या वचनानुसार भारतीय असूनही अशा समृद्ध ठेवा, वारसा, ज्ञानपरंपरेला नावे ठेवण्यात धन्यता मानणारे तथाकथित विद्वान, ढोंगी बुद्धिमंत व पुरोगामी या गोष्टींचा सतत उपहास व महानता उध्वस्त करण्यात गढून गेले आहेत. म्हणजे विदेशींनी भारतीय श्रेष्ठत्व जपले पण आपल्यातील अनेक नतद्रष्ट भारतीयांनी त्यास बट्टा लावण्याचे कार्य जोमाने चालू ठेवले आहे.

तात्पर्य एवढेच की भारतीय पुराणे व भागवतादी ग्रंथ हाच खरा इतिहास होय. उलट पाश्चात्यांनी 'हेतूपुरस्सर रचलेला' इतिहास म्हणजे त्यांच्या शब्द कोशातील 'myth' व्याख्येखाली (खोटेपणा व कल्पनाविलास) मोडतो.

हा लेख फार संक्षिप्त स्वरूपात लिहावा लागला कारण विषयाची व्याप्ती प्रचंड आहे. पण माझा मुख्य संदेश तुम्हाला पोचला असेल अशी आशा करतो. ह्या दीर्घलेखाचे संपूर्ण श्रेय ज्या ग्रंथांच्या आधारे तो लिहिला त्या सर्व लेखक, ग्रंथकार, रचनाकार यांनाच जाईल. मला शून्य! अनेकदा सांगितलेल्या गोष्टीचा पुनरूच्चार करतो. की माझे काम ट्रेझरी ऑफिसरसारखे आहे. मी पगाराचे पैसे वाटतो पण ते माझ्या खिशातील नसतात. ते 'ब्रह्मांड सरकारचे' असतात. मी फक्त संकलन, संपादन व वाटणी करतो. त्या ज्ञानदात्यांचे ऋण खालील संदर्भ यादीद्वारे जाहीर करतो. (१) 'दैत्यराज महाबळी' वामन कोल्हटकर (२) 'बाबाजी' – अनुवादक हेमलता जोशी (३) 'आत्मवृत्त' – योगानंद परमहंस (४) 'हिमालयातील गुरूंच्या सहवासात' – स्वामी राम (५) 'दिव्यस्पर्शी' – राम भोसले (६) पंचांगशास्त्रावरील पुस्तके (७) 'शंकर महाराज' – मृणालिनी जोशी (८) 'हिमालयस्थित गुरूच्या योगी शिष्याचे आत्मकथन' श्री. एम (९) 'श्रीपाद श्रीवल्लभचरित्रामृत' – शंकरभट्ट (१०) 'समर्थाचे सामर्थ्य' – कृ. ना. आठल्ये (११) प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज विरचित 'श्रीदत्तपुराण' व 'श्रीदत्तमाहात्म्य' (१२) 'हिरण्यगर्भ' – सखाराम आठवले (१३) अनेक धार्मिक ग्रंथ व पोथ्या (१४) वैयक्तिक संग्रहातील अनेक ग्रंथ /पुस्तके.

ही लेखमाला समाप्त झाली आहे. 'हिंदुबोध'ने वाचकांशी संवाद करण्याची संधी दिली हे मी माझे भाग्य समजतो. संपादकांनी संधी दिल्यास अशाच एका नवीन विषयावर लेखमाला सादर करेन. संपादक व वाचकांना मन:पूर्वक धन्यवाद देतो.

आपल्या प्रतिक्रिया माझ्या ईमेल

knadgaudagmail@com वर कळवू शकता.

**हणमंत नाडगौडा**

◈ ◈ ◈

# ब्राह्मोस क्षेपणास्त्र प्रणाली

ब्राह्मोस क्षेपणास्त्राची चर्चा सध्या सर्व जगभर सुरु आहे. याचे मुख्य कारण म्हणजे ब्राह्मोस क्षेपणास्त्रांनी ऑपरेशन सिंदूर दरम्यान घडवलेले पाकिस्तानच्या अकरा लष्करी विमानतळांचे केलेले भयानक स्वरूपातील प्रचंड नुकसान. प्रत्यक्ष अतिसंहारक क्षमता, अचुकता या भारताच्या लष्करी प्रत्युत्तरात पहायला मिळाली व पाकिस्तानला ती अनुभवायला मिळाली. त्याच्या दहशतीतून संपूर्ण पाकिस्तानचे राज्यकर्ते, लष्कर व अतिरेकी, तसेच सर्वसामान्य जनता ही बाहेर पडली नाहीये, आणि प्रचंड दडपणाखाली आहे.

ऑपरेशन सिंदूर ने संपूर्ण जगाला भारताची ताकद, प्रगल्भता व परिपक्वता दाखवून दिली. पहिली बाब म्हणजे अतिरेकी हल्याला नऊ अतिरेकी तळ व कुख्यात अतिरेक्यांचा केवळ अर्ध्या तासातच खात्मा केला. भारताची अचूक प्रहारक्षमता आणि गुप्तचर यंत्रणां बरोबरच अत्याधुनिक व अद्ययावत तंत्रज्ञान हे ही दाखवून दिले. भारताने पाकिस्तानचे कोणतेही नागरी अथवा लष्करी ठाणे लक्ष्य केले नाही, परंतु फोन करून सांगितले की याची प्रतिक्रिया द्याल तर आम्ही सोडणार नाही. त्याला जशास तसे लगेच व कठोर सडेतोड उत्तर मिळेल. पाकिस्तानने जम्मू काश्मिर, पंजाब, राजस्थान व गुजराथच्या सीमेवर एकदमच ड्रोन, क्षेपणास्त्रे यांच्यासह तोफखान्यांद्वारा जबरदस्त हल्ला केला. प्रत्युत्तरामध्ये भारतीय हवाई सुरक्षा कवच म्हणजेच चार स्तरीय हवाई सुरक्षा यंत्रणाद्वारे अप्रतिम कार्य करून सर्व हवाई धोके हवेतल्या हवेतच नष्ट केले, सीमेवरील चौक्या उध्वस्त केल्याच परंतु पाकिस्तानचे अकरा विमानतळ व रडार यंत्रणा यांना लक्ष्य करून त्याही उध्वस्त व बेचिराख केल्या. पाकिस्तानचे अंदाजे २०% हवाई युद्ध यंत्रणा क्षतिग्रस्त करून पाकिस्तानचे कंबरडे मोडले, ब्राह्मोस क्षेपणास्त्राचा भयानक परिणाम पाहून लगेचच पाकिस्तान गुढघ्यावर आले व शरणागती पत्करून पाक सैन्याच्या DGMO ने शस्त्रसंधीचा प्रस्ताव ठेवला. तीन अटींवर भारताने ऑपरेशन सिंदूर स्थगित ठेवले. एक म्हणजे यापुढे सीमापार अतिरेकी हल्ला युध्दच समजले जाईल व अतिरेकी व त्यांना सहाय्य व आधार देणारे पाक सरकार यात फरक न करता जबरी प्रत्युत्तर दिले जाईल, दुसरे म्हणजे अणुबॉम्ब ची धमकी देऊन भारत दबणार नाही, ब्लॅकमेल होणार नाही. आणि ऑपरेशन सिंदूर बंद केले नाही तर केवळ स्थगित केले आहे. 'अगर उधरसे गोली चली, तो इधरसे गोला चलेगा।' या भाषेत सज्जड दम दिला आहे.

भारताची संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता व संरक्षण सिध्दता यानिमित्त अधोरेखित झाली असून आकाशतीर, आकाश क्षेपणास्त्र, एकात्मिक आदेश व नियंत्रण प्रणाली (IACCSA Integrated Air Command and Control System), आत्मघातकी अचूकने मारा करणारा ड्रोन, इलेक्ट्रॉनिक युद्धतंत्राची पकड, इस्रोची मदत या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून भारताची नवीन दिशा (New Normal) ही लक्षणीय असून नव्या युद्धपर्वाची नांदी होय. भारतीय युद्धसामुग्री उत्पादकांना नवगती देऊन भारताची विश्वगुरू पदा कडे वाटचाल सुरु आहे. या निमित्त ब्राह्मोस क्षेपणास्त्र प्रणाली विषयीची माहिती आता आपण करून घेऊ.

भारताच्या संरक्षण रचनेमध्ये क्षेपणास्त्रांचे स्थान व भूमिका खूप महत्त्वाची आहे. एकात्मिक निर्देशित क्षेपणास्त्र विकास कार्यक्रम डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या नेतृत्वामध्ये यशस्वी राबवून स्वदेशी क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाचा भक्कम पाया घातला गेला. त्यामुळे आता भारताने क्षेपणास्त्रांसाठीचे सर्व प्रकारचे आवश्यक, अद्ययावत व अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित केले आहे. सध्या जगभर सुरू असणारे हायपरसोनिक क्षेपणास्त्र तंत्रज्ञान तसेच स्मार्ट (Supersonic Missile Assisted Release of Tarpedo) क्षेपणास्त्रासारखे Game Changer व चीनबरोबर शक्तिसंतुलन राखणारे तंत्रज्ञानही यशस्वी चाचण्या प्रत्यक्ष घेऊन सैन्यदलांचा आपण विश्वास संपादित केला आहे.

वायुसेनेसाठी अँटी-रेडिएशन (Anti-Radiation) क्षेपणास्त्र

रुद्रम विकसित करून दूरवरून लढाऊ विमानाद्वारे डागले जाणारे क्षेपणास्त्र शत्रू गोटात जाऊन रडार केंद्र उध्वस्त व नष्ट करता येते. त्यामुळे शत्रूच्या लढाऊ विमानांना मिळणारी व क्षेपणास्त्रांना मिळणारी रडार यंत्रणेची मदत बंद झाल्याने निर्देशन, दिशादर्शन व नियंत्रण यंत्रणामुळे मिळणारी मदत नसल्याने शत्रूची कार्यक्षमता एकदम कमी होऊन जाते व आपल्या वायुदलाच्या तावडीतून सुटणे कठीण तर होतेच पण प्रतिकार क्षमताही नष्ट होते. अशा विविध ताकदीची, विविध पल्ल्याची, विविध प्रकारचे लक्ष्यभेद करणारी क्षेपणास्त्रांची मालिकाच्या मालिका आपल्या सशस्त्र दलांच्या भात्यात आहेत. उदा. आकाश, नाग, अग्नि, MRSAM, QRSAM, प्रहार, प्रलय, ICBM अग्नि–5 इत्यादी.

अशाच पैकी शत्रूसाठी अत्यंत घातक असणारे क्षेपणास्त्र म्हणजे 'ब्राह्मोस'. रॅमजेट इंजिन तंत्रज्ञान वापरून बनवलेले हे क्षेपणास्त्र 'सुपरसोनिक क्रुझ' या प्रकारचे असून याचे वैशिष्ट्य म्हणजे हे जगामधील सर्वात जास्त गतीने झेपावणारे, आवाजाच्या तिप्पट वेगाने व जमीन अथवा समुद्राच्या पृष्ठभागापासून अतिशय कमी उंची वरून चपळतेने हालचाली करून 'लक्ष्या'चा अतिशय अचूक भेद करून शत्रूलक्ष्य नष्ट करण्याची क्षमता असणारे, एका अर्थी 'ब्रह्मास्त्रच' आहे. अजून एक वैशिष्ट्य म्हणजे हे क्षेपणास्त्र जमिनीवरून, समुद्रातील युद्ध नौकेवरुन, पाण्याखालील पाणबुडीमधून आणि हवेतून लढावू विमानावरुन अशा सर्व प्रकारांनी डागता येते.

भारत व रशिया या दोन देशांच्या सरकारांनी केलेल्या मैत्री कराराचा भाग म्हणून १२ फेब्रुवारी १९९८ या दिवशी संयुक्त प्रकल्प (Joint Venture) करण्याचे ठरले. भारताची DRDO व रशियाची NPOM यांच्या संयुक्त विद्यमाने क्षेपणास्त्र विकास व संशोधन करायचे निश्चित झाले. भारताचा ५०.५ प्रतिशत व रशियाचा ४९.५ प्रतिशत वाटा निश्चित करून 'ब्राह्मोस एरोस्पेस लिमिटेड' ही कंपनी भारतात सुरु झाली व त्याचा उद्देश जगातील सर्वोत्तम क्षेपणास्त्र संशोधन व विकास करणे, निर्माण करून उत्पादन करणे व आपल्या सेना दलांना पुरवठा करणे तसेच जगामधील आपल्या मित्रपक्षांना/देशांना विक्री करणे. आज भारताच्या भूसेना, नौसेना व वायुसेनेच्या सेवेत ब्राह्मोस क्षेपणास्त्र आहे.

ब्राह्मोस हे नाव जणू ब्रह्मपुत्रा व मस्कवा या दोन ज्ञान गंगाच्या संगमातून BrahMos असे नाव ठरविले आहे. ब्राह्मोस क्षेपणास्त्राचा शत्रूलक्ष्याकडे झेपावण्याचा वेग प्रचंड व कमी उंचीवरुन उडत जात असल्याने जगातील सर्वोत्तम रडार यंत्रणाही याला पाहू शकत नाहीत, हे कोणत्याही यंत्रणेच्या नजरेत येणे सध्या तरी शक्य नाही. म्हणून याच्यावर हवेतल्या हवेत प्रतिहल्ला होऊ शकत नाही, म्हणून हे अतिशय घातक शस्त्र मानले जाते. गतिमान शत्रूलक्ष्याचाही अचूक वेध घेता येतो कारण हे क्षेपणास्त्र सर्वात गतिमान असूनही लक्ष्यापर्यंत स्वनातीत (Supersonic) गतीने जाताना सुद्धा चपळतेने आवश्यकतेनुसार मार्गबदल करून 'लक्ष्यभेद' अचूक व 'तेज–मारकता' यामुळे लक्ष्य सफलपणे नष्ट केले जाते. 'डागा व विसरून जा' (fire forget) या तत्त्वावर कार्य यशस्वीच करते. या क्षेपणास्त्राचे उड्डाण लंबवत (Vertical) अथवा तिरप्या अवस्थेत प्रक्षेपक (Inclined) दोन्ही स्थितीतून होते, करता येते. तिन्ही सशस्त्र दलांसाठी ब्राह्मोस क्षेपणास्त्र म्हणजे हुकमाचा एक्का आहे.

'ब्राह्मोस क्षेपणास्त्र' बस नाम ही काफी है। याची प्रचिती आपण ज्यावेळी आपला महान लढाऊ वैमानिक विंग कमांडर वर्धमान महावीर हे चुकून पाकिस्तान हद्दीत उतरले होते व पाकिस्तानने बंदी बनवले होते तेव्हा याच क्षेपणास्त्राच्या भीतीने पाकिस्तानने त्वरित सुटका केली होती. दुसरी घटना म्हणजे एकदा 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्रांची देखभाल करताना चुकीने अपघाती फायर होऊन एक क्षेपणास्त्र पाकिस्तानच्या हद्दीत १२८ कि.मी. आत जाऊन पडले होते व ते चिनी बनावटीच्या अद्ययावत रडार यंत्रणेलाही समजले नव्हते, म्हणजे अपघाताने का होईना ब्राह्मोस क्षेपणास्त्र हे अद्ययावत रडार यंत्रणेच्याही पकडमध्ये, नजरेमध्ये येत नाही हे सिद्ध झाले व याची खात्रीच पटली. याचे कारण म्हणजे पृष्ठभागापासून केवळ १०–१५ मीटर उंचीवरून, आवाजाच्या तिप्पट वेगाने हे क्षेपणास्त्र अगदी लक्ष्यापर्यंत झेपावते व त्याचा अचूक वेध घेते, लक्ष्यभेद करून ते नष्ट करते. हालते गतिमान लक्ष्य अचूक भेदण्यासाठी अतिशय जलद हालचाली करून चपळतेने वळणे घेऊन नेम साधते त्यामुळे आपल्या ब्राह्मोस क्षेपणास्त्रावर शत्रूला प्रतिहल्ला करणे केवळ अशक्य आहे. अगदी अमेरीकेच्या टॉमहॉक या क्षेपणास्त्राच्या दुप्पट गतीने ते झेपावते आणि जलद व तेज प्रहार करते ही क्षमताही जास्त आहे.

'ब्राह्मोस' क्षेपणास्त्राचा जास्तीत जास्त पल्ला हा २९० किमी असून २०० ते ३०० किग्रॅ वजनाचे युद्धशीर्ष (Warhead - Bomb) वाहून नेण्याची व पारंपरिक अथवा आण्विक बॉम्ब डागण्याची 'ब्राह्मोस' ची क्षमता आहे. जगातील हे सर्वात जलद गती असणारे 'सुपर सोनिक क्रूझ' क्षेपणास्त्र आहे. म्हणून याला 'सुपर सोनिक क्रूझ क्षेपणास्त्र सम्राट' म्हटले जाते. अचूक मारा हे याचे वैशिष्ट्य आहे. MTCR-Missile Technology Control Regime अर्थात क्षेपणास्त्र तकनीक नियंत्रण संधीवर हस्ताक्षर न केल्यामुळे ३०० किमीच्या मर्यादित पल्ल्याच्या क्षेपणास्त्रासाठी रशिया तयार होते. आता आपणही MTCR वर हस्ताक्षर केल्याने ब्राह्मोस–२, ब्राह्मोस-NG, इत्यादी क्षेपणास्त्रांचे विकास कार्य सुरू आहे.

- ब्राह्मोस क्षेपणास्त्र चार प्रकारांमध्ये उपलब्ध आहे

१. युद्ध नौकेवरून डागता येणारे ब्राह्मोस (Ship Based)

२. जमिनीवरून डागता येणारे ब्राह्मोस (Land Based)

३. लढाऊ विमानावरून डागता येणारे ब्राह्मोस (Air Launch)

४. पाणबुडीमधून डागता येणारे ब्राह्मोस (Submarine Launch)

**१. युद्ध नौकेवरून डागले जाणारे ब्राह्मोस क्षेपणास्त्र :–** जगातील सर्वात घातक सुपरसोनिक कुझ क्षेपणास्त्र म्हणून 'ब्राह्मास' मानले जाते. समुद्रावरील किंवा समुद्रकाठावरील लगतची जमिनीवरील असणारी शत्रूची 'लक्ष्य' अत्यंत वेगवान परंतु तरीही अचूक मारा करून लक्ष्य नष्ट करण्यात ब्राह्मोस क्षेपणास्त्राचा हातखंडा आहे. नौसेनेच्या रचनेमध्ये युद्धनौकेवर मग ती चल अथवा अचल स्थितीमध्ये असेल व त्यावरील प्रक्षेपक लंबवत (Vertical) अथवा तिरप्या (Inclined) स्थितीतूनही ब्राह्मोस क्षेपणास्त्र डागून दूरवरील कमाल २९० किमी अंतरावरील लक्ष्य अचूकतेने भेदणे लीलया पार पाडण्याची क्षमता आहे. त्यामुळे नौसेनेच्या पुढील फळीतील युद्धनौकांवर सध्या INS राजपूत वर्गाच्या युद्धनौकांवर ब्राह्मोस क्षेपणास्त्रे स्थापित केली आहेत. विनाशिका व फ्रिगेट या मुख्य युद्धनौका प्राथमिक आक्रमण करतात.

अनेक चाचण्यांनी हे प्रदर्शित केले आहे की, ब्राह्मोस क्षेपणास्त्र फायर केल्यावर अत्यंत वेगाने झेपावते व क्षणार्धात, अगदी अचूक (Pin Point Accuracy) मारा करून संपूर्ण लक्ष्य नष्ट केले जाते (lethal Power to annihilate).

याच्या समुद्रावरून डागून समुद्री लक्ष्य तसेच जमिनी लक्ष्यसुद्धा अचूकपणे भेदले गेल्याच्या प्रत्यक्ष फायरिंग चाचण्या यशस्वी करून खात्री करून सिद्ध झालेय. याच चाचण्यांबरोबर एकाच वेळी अनेक क्षेपणास्त्रांचा एकाच लक्ष्यावर अथवा विभिन्न लक्ष्यांवर भडिमार करून लक्ष्य नष्ट करण्याची क्षमता ही सिद्ध केली. (Prooved Salvo Launch Capability). साल्व्हो फायर हा विविध लक्ष्यांना विविध मार्गांनी वेध केवळ २ ते २.५ सेकंदाच्या अवधीत एकाच वेळी जास्तीत जास्त आठ ब्राह्मोस क्षेपणास्त्रांचा भडिमार करून अचूक निशाणा साधला जातो. लंबवत प्रक्षेपक (Universal Vertical Launch Module - UVLM) यशस्वी तंत्रज्ञान विकसित केले आहे.

'ब्राह्मोस' २००५ मध्ये नौसेनेत दाखल करण्यात आले आहे. संगणकीय नियंत्रण प्रणाली (Fire Control Computer - FCC) तसेच क्षेपणास्त्राचे प्रक्षेपक युद्ध नौकेच्या सुकाणू संचार तंत्रज्ञानाशी व सेंसरशी जोडलेले असते. क्षेपणास्त्राला योग्य मार्गक्रमण (Navigation) करण्यासाठी आणि मध्ये मार्ग दुरुस्ती करण्यासाठी Inertial Navigation System (INS) आधारित निर्देशन प्रणाली असते आणि शत्रूचे लक्ष्य अचूक वेधण्यासाठी अंत्य निर्देशन (Terminal Guidance) होमिंग रडार सीकरमुळे देता येते व अचूक मारा करणे शक्य होते, लक्ष्य संपूर्णपणे नष्ट होते. यासाठी GPS/GLONASS याचाही अचूकतेत भर घालण्यासाठी उपयोग आहे.

**२. जमिनीवरून डागता येणारे ब्राह्मोस क्षेपणास्त्र :–** या क्षेपणास्त्राचे सर्व गुणधर्म समानच अगदी युद्धनौकेवरील ब्राह्मोस सारखेच आहेत. म्हणजे त्याची अजोड गतिमानता, अत्यंत अचूकता, सर्वनाशी घातकता वगैरे. स्वयंचलित गतिमान प्रक्षेपक (M-L-Mobile Autonomous Launchers) असे चार ते सहा एकत्रित असतात व त्याचे नियंत्रण चल नियंत्रण कक्ष (MCP-Mobile Command Post) आणि चल पुनर्भरण वाहन (MRV - Mobile Replenishent Vehical) यांनी ही प्रणाली बनते. MAL वाहनावर स्वतःचे संवादकेंद्र, शक्ति पुरवठा आणि प्रक्षेपण नियंत्रण प्रणाली (Fire Control System) असते. तीन 'ब्राह्मोस' क्षेपणास्त्र तीन प्रक्षेपक नळीमध्ये स्वतंत्र

भरलेले असतात. तीनही क्षेपणास्त्रे स्वतंत्रपणे किंवा एकत्रितपणे त्यांना सोपावलेल्या लक्ष्यावर एकाच वेळी अचूक मारा करून ते नष्ट करतात. व INS/GPS यंत्रणांचीही मदत घेऊ शकतात त्यामुळे अचूकतेत वाढच होते. या प्रकारच्या ब्राह्मोस क्षेपणास्त्राची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे –

– कमीत कमी संख्येने जमिनीवरील यंत्रणा

– अत्याधुनिक व अद्ययावत आदेश आणि निर्देशन प्रणालीने युक्त (C4I वातावरणाशी जुळणारी व कार्य करणारी प्रणाली C4I- Command. Control. Communication, Computers and Intelligence)

सैनिकांसाठी वातानुकुलित कक्ष व NBC संरक्षण, जमिनीवरील ब्राह्मोस क्षेपणास्त्र प्रणाली ही २००७ मध्ये भूसेनेच्या सेवेत दाखल झाली. तीन प्रकारच्या युद्धभूमीवर ती तैनात केली आहे. पहिला प्रकार (Block I) यामध्ये क्षेपणास्त्रास हवेतल्या हवेमध्ये मार्गबदल चपळतेने करण्याची क्षमता, अचूक वज्रप्रहार क्षमता, बाकीच्या वैशिष्ट्यांसह आहेत. दुसऱ्या प्रकारच्या युद्ध भूमीवर (Block II) आवाजाच्या तिप्पट वेगाने झेपावत असताना छलांग (Steep Dive) सूर मारणेची आणि 'लक्ष्या' मधील फरक/भेद ओळखण्याची क्षमता असून तिसरा प्रकार (Block III) पर्वतीय क्षेत्र युद्ध क्षमता.

स्वयंचलित गतिमान प्रक्षेपक (MAL) हे अत्यंत आधुनिक व अद्ययावत तंत्रज्ञानाने बनविले आहे. ज्यासाठी ४० KVA चे डिझेल जनित्र लागणारी ऊर्जा व शक्ती प्रदान करते. पर्यायी व्यवस्था म्हणून विद्युत घटासह अखंड शक्तिस्रोत वाहनावर उपलब्ध आहे. क्षेपणास्त्र कायमच झेपावण्यास तयार स्थितीतच प्रक्षेपक असून त्यावरील संदेश व संवाद यंत्रणा, रडार यंत्रणा याद्वारे 'लक्ष्य'ची संपूर्ण माहिती वेळीच मिळते आणि प्रक्षेपण नियंत्रण प्रणाली कायमच समन्वय व नियंत्रण करते या यंत्रणा अद्ययावत व अत्याधुनिक आहेत. यासाठी उच्च गतिमानता सर्व प्रकारच्या युद्धभूमीवर राहावी असे TATRA वाहन उपयोगात आणले आहे. MAL द्वारे एक-एक अथवा एकत्रितपणे सर्व क्षेपणास्त्रे विविध लक्ष्यांवर एकाच वेळी डागली जातात अशी Salvo Firing ची क्षमता आहे. फायर करताना लंबवत अथवा तिरके मात्र वाहतुकीसाठी सोईचे म्हणून जमीन समांतर स्थितीत प्रक्षेपक नळी ठेवतात, यासाठी हायड्रॉलिक यंत्रणांची तरतूद केली आहे.

**३. हवेतून लढाऊ विमानावरून डागता येणारे ब्राह्मोस क्षेपणास्त्र:–** क्षेपणास्त्राचे बहुतक गुणधर्म तेच ठेवले आहेत मग सुपरसोनिक क्रूझ क्षेपणास्त्र आवाजाच्या तिप्पट वेगाने झेपावणे, अत्यंत अचूक व तेजप्रहार करून लक्ष्य नष्ट करणे तसेच शत्रूच्या कोणत्याच यंत्रणांद्वारे हे क्षेपणास्त्र दिसतच नाही, कळतही नाही, जेव्हा कळते तेव्हा लक्ष्य संपूर्ण विनाश झालेले असेल. यासाठी ALCM (Air Launched Cruise Missile) चा उपयोग समुद्री व जमिनी लक्ष्यावर मारा करण्यासाठी करतात. ब्राह्मोस ALCM हे वजनदार व अत्यंत घातक असे क्षेपणास्त्र भारताच्या वायुसेनेच्या भात्यात आहे. हे क्षेपणास्त्र सुखोई ३० मार्क १ या लढावू विमानावरुन डागतात.

सुखोई ३० लढाऊ विमानाच्या खाली असलेले ब्राह्मोस क्षेपणास्त्र गुरूत्व आधारित सोडून दिले. खाली पडता पडता दोन टप्प्याचे इंजिन पूर्व नियोजित वेळी आपोआप पेट घेते. बंगालच्या खाडीमध्ये असलेल्या निर्धारित लक्ष्याकडे झेपावते आणि वैशिष्ट्यांप्रमाणे कार्य करते आणि २२ नोव्हेंबर २०२२ या दिवशी इतिहास घडला. याची पुनःचाचणी २०१९ मध्ये करून खात्री करून घेतली व समुद्री लक्ष्य व जमिनीलक्ष्य सुदूर अंतरावरून (Long Stand-off) दिवसा तसेच रात्रीही, आणि सर्व प्रकारची हवामानातही तीच अन्य कुणाहीपेक्षा सरस, अद्ययावत व अत्याधुनिक हवाई हल्ला क्षमता व निर्णायक पद्धतीने असणारा परिणाम याची खात्री करून घेतली. ऑपेरेशन सिंदूर मध्येही नेमके ह्याच ब्राह्मोस क्षेपणास्त्रांची ही प्रत्यक्ष युद्धात उपयोग करून पाकिस्तान मध्ये हाःहाःकार माजवला.

२० जानेवारी २०२० रोजी चौथ्या पिढीच्या सुखोई SU-30 MK1 लढाऊ विमानांची वाहिनी (Squadron) टायगर शार्क २२२ वाहिनी ब्राह्मोस क्षेपणास्त्रांसह सिद्ध झाले आणि मोठ्या प्रमाणावर ब्राह्मोसची तैनाती करून सेवेत दाखल केले. हवाई व समुद्री क्षेत्रावर वर्चस्व ठेवण्यासाठी अधिक बळ मिळाले आहे.

**४. पाण्याखालून पाणबुडीतून डागले जाणारे 'ब्राह्मोस' क्षेपणास्त्र :–** हे जहाजावरून फायर होणाऱ्या ब्राह्मोजप्रमाणेच आहे. त्याच्या क्षमताही तशाच आहेत. पाण्याखाली पृष्ठापासून ४० ते ५० मी असणाऱ्या पाणबुडी वरून हे डागता येते. लंबवत

प्रक्षेपक समूह पाणबुडीच्या प्रेशर हल मध्ये बसवण्यात येतो. उर्ध्वगामी प्रक्षेपण करणाऱ्या नलिकेस (Canister) वरील बाजूस बूच लावलेले असते ते पाणी आत जाऊ देत नाही. क्षेपणास्त्राला एक सेंसर बसविलेला असतो, ज्याद्वारे फायर झाल्यावर संपूर्ण क्षेपणास्त्र पाण्याबाहेर पडल्याचा संदेश देते व क्षेपणास्त्र आपली दिशा बदलून लक्ष्याकडे झेपावते व लक्ष्यभेद करते.

पाणबुडीवरील ब्राह्मोस क्षेपणास्त्राच्या सामावेशामुळे त्याच्या रक्षण क्षमतेबरोबरच आक्रमण क्षमता खूप वाढेल कारण टार्पिडो हे पूर्णपणे रक्षणासाठी वापरतील. २० मार्च २०१३ मध्ये बंगालच्या उपसागरात विशाखापट्टणच्या किनाऱ्यालगत पाणबुडीवरून उर्ध्वगामी प्रक्षेपकातून ब्राह्मोस क्षेपणास्त्र झेपावत यशस्वी चाचणी, पूर्ण २९० कि. मी. पल्ल्याची चाचणी घेऊन त्याची खात्री केली. सर्व रडार, टेलिमेट्री यंत्रणांद्वार संपूर्ण मार्गावरून क्षेपणास्त्र झेपावताना निरीक्षण केले. मागोवा घेऊन सर्व बिंदू नियोजित व अपेक्षित परिणाम मिळाले आणि क्षेपणास्त्राने Pin Point अचूकतेने लक्ष्यभेद अपेक्षित परिणामासह केला आणि ब्राह्मोस सेवेत संमिलित केले.

अशा चारही प्रकारचे ब्राह्मोस क्षेपणास्त्र सशस्त्र सेनेच्या सेवांमध्ये समाविष्ट करून अत्यंत घातक, शत्रूला धडकी भरवणारे क्षेपणास्त्र आपल्या भात्यात आहे. ब्राह्मोस- २ सहाशे किमि पल्ला व आवाजाच्या सातपट वेग असे उद्दिष्ट ठेवून विकासकार्य सुरू आहे. ब्राह्मोसचे यश पाहून अनेक मित्र देशांनी मागणी नोंदवली आहे व त्याची विक्री भारत महासत्तेकडे वाटचाल करत असल्याचे लक्षण आहे. तंत्रज्ञानही भविष्यवेधी संशोधन सुरू असून कमी खर्च, कमी जागा, आकार, वजन, नाविन्यपूर्ण पद्धतीने शत्रूच्या रडार यंत्रणांच्या नजरेत सापडणार नाही असे (Stealth) सर्व क्षमतांमध्ये वाढ मात्र कोठल्याच बिंदूशी तडजोड न करता पुढील पिढीचे ब्राह्मोस-NG क्षेपणास्त्र बनवणे सुरू आहे. अशाने भारताच्या शक्तीत भरच पडून भारत हा पुन्हा विश्वगुरू निश्चितच होईल यात शंका नाही.

।। भारतमाता कि जय ।।

**काशीनाथ दामोदर देवधर**

**ज्येष्ठ शास्त्रज्ञ डीआरडीओ (निवृत्त)**

◈ ◈ ◈

**विचारधन...**

आपले लक्ष शुद्ध व निर्मळ ठेवा. आपल्या चालण्यातला जो आधार आहे त्याचे लक्ष शुद्ध, निर्मळ असायला हवे. स्वतःमध्ये विचारांची स्पष्टता व दूरदृष्टी हवी. चालताना अंधारात चालतोय की प्रकाशात, याचे भान राहील. रोजच्या जीवनात कळत नकळत अनेक जीवनक्रिया करत असतो. चालणे, बसणे, उभे राहणे, जेवणे, बोलणे, झोपणे ह्या मूलभूत क्रिया आहेत. या क्रिया करताना एकही चूक न करता अगदी योग्यरीतीने केल्या, तर जीवनात नक्कीच बदल घडून शकतो. क्रिया करत असताना आपले लक्ष निश्चित लागते. क्रिया आपण कशाच्या आधारे व कोणत्या समयी करतोय हे महत्त्वाचे आहे. प्रवासाची दिशा आपल्याला स्पष्टपणे दिसत राहील. प्रवासात चालताना आपण कोणाचा आधार घेतोय हे महत्त्वाचे आहे. द्रोणाचार्यांनी दुर्योधनाचा आधार घेतला, त्याचा परिणाम काय झाला?दुर्योधनाने शकुनीचा आधार घेतला, कैकेयीने मंथरेचा आधार घेतला या सर्वांचे परिणाम, अर्जुनाने कृष्णाचा सहारा घेतल्यावर काय झाले? कोणाचा आधार घेतो हे जास्त महत्त्वाचे असते. यातूनच विचारात निश्चिती, स्पष्टता व निष्ठा येते. ज्या क्षणी आपल्यामध्ये या गोष्टी उतरतात, तेव्हा आत्मविश्वासही निर्माण होतो. जीवनप्रवासात येणाऱ्या संधीची वाट बघते, समोर आलेली संधी ओळखा. जे संधीची वाट बघतात ते अडखळतात. आलेल्या संधीचा पुरेपूर उपयोग करणे महत्त्वाचे असते. उलट तुम्ही जर सबबी सांगत बसलात, तर आयुष्यात कधीच यशस्वी होणार नाहीत. भावनांमधून सबबीरूपी रोगाला बाहेर काढणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सबबी, कारणे व समर्थन देत होतो असा आयुष्यातील एखादा क्षण समोर आणा. सबबींमुळे आपल्यावर फक्त पश्चात्तापाची वेळ येते. पण त्या सगळ्यावर मात करून जर संधीचे सोने केले, तर स्वतःच्या यशाचा अभिमान नक्कीच वाटतो. यशस्वी झालेली व्यक्ती वेगळे काही करत नसते, जे करते ते वेगळ्यारीतीने करून स्वतःचा वेगळेपणा सिद्ध करते. मनात संशय, द्विधा मनःस्थिती नसल्याने ती आत्मविश्वासाच पाऊल उचलतो. मी तुम्हाला कोणतीच अवघड गोष्ट करायला सांगितली नाही. फक्त आपल्या रोजच्या जीवनात ज्या गोष्टी आपण सहज करतो त्याकडे लक्षपूर्वक पाहून त्या कशा योग्य पद्धतीने करायच्या हेच सांगितले आहे. जीवनाच्या वाटेवरून चालताना ज्ञान, दर्शन, चरित्र यांचा आधार घेतलात तर याचाच अर्थ तुमच्या जीवनाचा प्रवास प्रकाशमान वाटेवरून सुरू झाला आहे, असे स्पष्ट होते.

# विठ्ठला तू वेडा कुंभार

'प्रपंच' या चित्रपटातील, 'पोटा पुरता पसा पाहिजे' या गाण्यावर लेख लिहीतांना, या चित्रपटाची पार्श्वभूमी लिहीली होती. तशी या चित्रपटातील सर्वच गाणी अर्थपूर्ण आणि सुश्राव्य आहेत. बाबूजी आणि आशाताईंनी ही त्यांच्या सुरेल आवाजात गाऊन अजरामर केली आहेत. ही सर्व गाणी लोकप्रिय होण्याचे श्रेय, जसं या गाण्यांना दिलेल्या सुंदर संगीताला जातं, त्याचबरोबर शब्दप्रभू, 'गदिमांच्या'अगदी सोपे, चपखल आणि अर्थपूर्ण शब्दांच्या काव्याला सुद्धा तितकंच जातं.

आता हेच गाणं पहा ना, 'विठ्ठला तू वेडा कुंभार' हे सुद्धा तितकंच अर्थपूर्ण आहे.  या मायावी असणाऱ्या जगाचा निर्माता, चालक, पालक आणि शेवटी सृष्टीचा अंत करणारा सुद्धा परमेश्वरच आहे, (जो इथे सर्व संत मंडळी, आणि समस्त वारकऱ्यांचा परमदैवत असणारा 'विठ्ठल' आहे), हे हिंदू धर्मात प्रतिपादीत केलेलं त्रिकालाबाधित सत्य आणि तत्वज्ञान या गीतातून, आपल्यासमोर  येतं.

हे सुपरिचित गाणं, या चित्रपटातील एक महत्त्वाचं पात्र असणाऱ्या 'देवा' कुंभाराच्या' (शाहीर अमर शेख) यांच्या तोंडी आहे. हा व्यवसायानं मातीची मडकी घडवणारा कुंभार. कुंभाराचं चाक फिरवून फिरवून, पोरवड्यानी भरलेला संसाराचा गाडा कसाबसा ओढतो आहे. कुंभाराच्या, कामाच्या मडकी घडविणारा, या प्रतिकाचा सुरेख वापर या भजनात केला आहे. ही किमया फक्त गदिमाच करू शकतात. काम करताना देवाचं नामस्मरण करण्यासाठी म्हणून, ह्या गाण्याचं प्रयोजन दिसतं.

फिरत्या चाकावरती देसी
मातीला  आकार
विठ्ठला तू वेडा कुंभार
विठ्ठला तू वेडा कुंभार ।।धृ।।

या जगाचं चक्र अव्याहतपणे परमेश्वर फिरवतोयं. या फिरत्या चाकावर सफाईने, कौशल्यपूर्ण बोटं फिरवून, मातीरूपी सृष्टीला आकार देण्याचं काम परमेश्वर करतोय. खरोखरच, विठ्ठला, तू पण माझ्यासारखाच वेड्यासारखा या जगासाठी राबतो आहेस. तुझ्या अविरत कष्टामुळेच या सृष्टीची नियमित कार्य चालू आहेत. कोणत्याही परिणामांची तमा न बाळगता, तू तुझं कार्य सातत्याने करतो आहेस. केवळ ह्या सृष्टीचा पसारा, निष्काम भावनेने सातत्याने चालवायचा, या एकाच वेडाने तू झपाटल्यासारखे काम करत आहेस, ज्याप्रमाणे, मी सुद्धा हेच करत आहे. अर्थातच तुझ्यासारख्या किमयागाराच्या कामाची आणि माझ्यासारख्या पामराच्या कामाची तुलना होऊच शकत नाही.

माती पाणी उजेड वारा
तूच मिसळसी सर्व पसारा
माती पाणी उजेड वारा
तूच मिसळसी सर्व पसारा
आभाळच मग ये आकारा
तुझ्या घटांच्या उतरंडीला
नसे अंत ना पार
तू वेडा कुंभार
विठ्ठला तू वेडा कुंभार ।।१।।

माती, पाणी, उजेड आणि वारा, (निसर्गातील पंचमहाभूते) यांचा बेमालूमपणे वापरून हा सर्व पसारा, एकमेकांत मिसळून टाकतो आहेस. या एकत्रीकरणामुळेच, मग हे अवकाश तयार होत आहे. या अवकाशाच्या छताखाली, या सृष्टीतील निरनिराळ्या घट रूपी जीवांची तू उतरंड निरपेक्ष वृत्तीने निर्मिती करून त्यांना, त्यांची भूमिका पार पडण्यासाठी मुक्तपणे सोडून देतोस. अशा तुझ्या या निर्मितीला काही शेवट नाहीच, आणि तो शेवट कधी आणि कुठे आहे, याचा अंदाज आमच्या सारख्या सामान्य माणसांना कधीच लागत नाही.

घटा घटाचे रूप आगळे,
प्रत्येकाचे दैव वेगळे,
तुझ्याविणा ते कोणा न कळे

मुखी कुणाच्या पडते लोणी,
कुणा मुखी अंगार!
तु वेडा कुंभार.. ।।२।।

तू निर्माण केलेल्या या विविध जीवसृष्टी मधील प्रत्येक घटाचे, रूप वेगवेगळे आहे, प्रत्येकाचे प्राक्तन वेगळे आहे. त्याचं या सृष्टीतील स्थान, आणि त्याचा या सृष्टीत वास्तव्याचा कालावधी, यांचं असं वेगळेपण जपण्याचे तुझे कौशल्य वाखाणण्याजोगे नक्कीच आहे. तसंच याचा ठाव तुझ्याशिवाय तो कोणालाच असत नाही. ज्याच्या त्याच्या पूर्वसंचिता प्रमाणे, कोणाला सुखाच्या रूपाने लोण्यासारखं मुलायम आयुष्य वाट्याला येतं, तर कोणाच्या वाट्याला दुःखाच्या अंगाराचे चटकेच येतात.

तूच घडविसी तूच मोडीसी
कुरवाळीसी तू, तूच तोडीसी
नकळे यातुन काय जोडीसी
देसी डोळे परी निर्मिसी
तया पुढे अंधार
तू वेडा कुंभार, विठ्ठला,
तू वेडा कुंभार ।।३।।

या सृष्टीतील सगळेच घट तूच निर्माण करतोस, तर ते मोडतो ही तूच. कोणाला प्रेमाने कुरवाळतोस, तर, कोणाला निर्दयपणे तोडतोस. अशा या मोडतोडीच्या सर्व कलाकारीत, नक्की काय साधतोस, हे तुझं तुलाच ठावूक रे बाबा!! तू निर्माण केलेल्या सृष्टीचं अवलोकन करण्यासाठी एकीकडे ज्या डोळ्यांची निर्मिती करतोस त्याची दृष्टी मात्र हिरावून घेतोस, आणि त्याच्या समोर कायमचा मिट्ट काळोख निर्माण करतोस. हा कसला रे, क्रूर विरोधाभास! खरंच, तू एक माझ्या सारखा एक वेडाच कुंभार आहेस.

असं हे ईश्वराचं एका वेगळ्या रुपाचं वर्णन करणारं, आणि त्याचं या सृष्टीची कलात्मक रीतीने निर्मिती करणारा एक, म्हणून महत्व अधोरेखित करणारं हे भजन. गदिमांच्या साध्या सोप्या आणि अर्थपूर्ण शब्दांनी हे अजरामर करून ठेवलंय, यात शंकाच नाही.

**ब्रह्मानंद घुगरे**

◈ ◈ ◈

**विचारधन...**

विश्वास ठेवा, अशक्यही शक्य होईल. स्वामी समर्थ सुरुवात करतात स्वप्नांपासून. स्वप्न अर्थात मनोरथ. काही स्वप्ने भूतकाळातून येत असतात. जी स्वप्ने पाहत नाही, ती दिसतात. तुम्ही स्वतः स्वप्न पाहायला शिका. आज जे तुम्हाला शक्य आहे तिथपासून सुरुवात करा. आज एक पाऊल उचलणे शक्य असेल, तर तिथून सुरुवात करा, जितके शक्य आहे त्या पूर्णक्षमतेने सुरुवात करा. त्याच्याशी तडजोड करू नका. जे करू शकत नाही ते आज ना उद्या करू शकू, हा विश्वास ठेवा. जेव्हा ही सुरुवात कराल तेव्हा लक्षात येईल की, खूप काही करू शकतो. पण, त्याचा विचारच केलेला नव्हता. त्यामुळे ती सुरुवात करणे महत्त्वाचे आहे. जितका भोग कमी कराल तेवढी तुमची शक्ती आपोआपच वाढत जाईल. याची सुरुवात तुम्ही केली की, योग आपोआपच तुमच्या जीवनात उतरेल. जीवनात जे करू शकता, त्याचाच विचार करा. जे करू शकत नाही, त्याचा विचारच करू नका. मी आज काय करू शकेन, याची एक यादी तयार करा. काही साध्या साध्या गोष्टींची सुरुवात करून तुम्ही त्यात ऊर्जा वाचवू शकता. जे पाप मी करीत नाही त्या पापातून माझी मुक्ती व्हावी, हे पचकानचे सूत्र आहे. जे करू शकता ते केल्याशिवाय झोपायचे नाही, हा मनाशी निर्धार ठेवा. जे करू शकत नाही ते आज ना उद्या होईल, हा विश्वास मनात ठेवा. जे करू शकतो अशा गोष्टी एकदा मनाशी निश्चित झाल्या, की त्या दिशेने कार्यप्रवृत्त होतो व ते करू लागतो. त्यातून जीवनात खूप परिवर्तन घडू लागते. त्या दिशेने जाण्याची सुरुवात आपण सगळे मिळून करूया. जे आज शक्य नाही तेसुद्धा संभव होईल, अशी आस्था, विश्वास मनामध्ये असणे जरुरी आहे. परमात्म्याने आशा ठेवण्यास सांगितले नाही, तर श्रद्धा ठेवण्यास सांगितले आहे. जे शक्य नाही तेसुद्धा मी करेन, हा विश्वास ज्याच्याकडे असतो तोच जिंकतो. जो केवळ आजचे शक्य आहे तेवढेच करतो तो विकसित होत नाही. पण, जे शक्य नाही तेसुद्धा जमेल अशी श्रद्धा, आस्था, विश्वास मनात ठेवतो, तो उन्नत होत जातो. यातूनच तुम्ही जयवंत व्हाल व त्यातून सफलता आणि समाधान दोन्ही प्राप्त होईल.

# विकारग्रस्तांची चिखलफेक

संघाच्या विजयादशमी उत्सवात पूजनीय सरसंघचालक मा.डॉ.मोहनजी भागवत त्यांनी, भारताला जागतिक लिडर बनवण्यासाठी लोकांत उत्साह आहे, हे नमूद केले. या दिवशी विचारांचे सोनं लुटण्याची संधी काही राजकीय नेत्यांनी गमावली. दसरा मेळाव्याच्या परंपरेला हरताळ फासण्याचा करवंटेपणा सांप्रतकाळी दिसून आला. सामाजिक संस्था, राजकीय पक्ष आणि नेत्यांनी विचाराऐवजी विखारांची पेरणी केली. त्यामुळे हा विकारग्रस्तांचा मेळावा होता, असे म्हणावे लागेल. मुंबईत शिवसेनेचे दोन, बीडमध्ये मुंडे परिवाराचा आणि आणि मराठा योध्दा जरांगे पाटलांचा मेळावाही झाला. त्यानंतर उमटलेल्या क्रिया आणि प्रतिक्रियांचा अन्वयार्थ म्हणजे विकारग्रस्तांची चिखलफेक आणि नेत्यांच्या अस्तित्वाची लढाई हे अधोरेखित होय. काही सामाजिक कार्यकर्त्यांनी दसरा मेळाव्यात विचारांचे सोने लुटण्याची परंपरा खंडित करण्याचे काम राजकीय पक्ष व सामाजिक संस्थांच्या नेत्यांनी केली. त्यांनी विचारांचे सोने देण्याऐवजी विखार विचार मांडले. त्यामुळे अशा मंडळींकडून लोकांनी, जनतेने काय अपेक्षा करावी, याकडे लक्ष वेधले होते. त्याविषयीचे हे चिंतन.

राष्ट्रीय विशेषतः शेजारच्या देशात निर्माण झालेली जेन झी ची पृष्ठभूमी, राज्यात सत्ता गेल्याची हताशा आणि आगामी निवडणुका तसेच आरक्षण आंदोलनामुळे जातीय तणाव पेटविण्याची खुमखुमी नेतेमंडळींची होती. त्यामुळे जहर आणि ज्वर पेटते ठेवत विखारी मेळावे पार पडले. नागपुरात सकाळी साडेसात वाजता मा. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी विशिष्ट समुदायाला हिंसाचारासाठी आणि चिथावणी देण्याची कारणे विषद करताना लोकशाहीतूनच आमूलाग्र बदल शक्य आहे, हे आवर्जून नमूद केले.

आपल्या शेजारील देशांत अशांतता आहे. श्रीलंका, बांगलादेश पाठोपाठ नेपाळात हिंसाचारातून सत्तांतर घडले. तेथील हिंसक उद्रेक चिंताजनक आहे. अशाच प्रकारे अशांतता निर्माण करू पाहणाऱ्या शक्ती भारतात सक्रिय आहेत, हे सरसंघचालकांनी सांगितले. हिंसक उद्रेकामध्ये इच्छित बदल घडवून आणण्याची शक्ती नसते. आणिकाही लोक जाणुनबुजून एकतेवर प्रहार करण्याचे प्रयत्न करतात. श्रध्दास्थाने, महापुरुष व प्रार्थनास्थळासंबंधात अनादराच्या घटना घडतात. यामागे हिंसा हाच हेतू असतो. हे त्यांनी अधोरेखित केले. शांतता, स्थिरता, आणि प्रगती भारताच्या समृध्दीसाठी आवश्यक आहे. संघ शताब्दीनिमित्त पंच परिवर्तनाचा संकल्प त्यांनी सांगितला. तसेच म.गांधी यांच्याविषयी गौरवोद्गार काढताना स्व आधारित भारताची संकल्पना दृढ करणे आवश्यक आहे. म.गांधी यांनी हे तत्वज्ञान सांगितले. हिंदू समाज सर्वांना सामावून घेणारा समाज आहे. त्याची शक्ती आणि चारित्र्य एकतेची हमी देते. तो आम्ही आणि ते या मानसिकेतून मुक्त आहे. नेहमी राहील. श्रीमंत गरीब यांच्यातील अंतर वाढतेय. जगभर आर्थिक शक्ती मोजक्या लोकांच्या हाती केंद्रित झाली, अशी गंभीर चिंता सरसंघचालकांनी प्रकट केली. समाजातील सज्जन शक्ती आणि युवा पिढीलाही सजग राहून सामाजिक व्यवस्था टिकवून ठेवण्याची गरज भासल्यास हस्तक्षेप करण्याचे आवाहन सरसंघचालक मा.भागवत यांनी संघाच्या दसरा उत्सवात केले.संघाच्या मेळाव्यात माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संघात जातीभेद नाही, अस्पृश्यताही नाही. संघ स्वयंसेवक भारतीय परंपरेतील एकता आणि सातत्य यांना महत्व देतात, असे त्यांनी सांगितले.

**भीत्यापोटी ब्रह्मराक्षस...** : प्रबोधनकार बाळासाहेब ठाकरे यांचा दसरा मेळावा ऐतिहासिक असायचा. सरकारला आणि हिंदुत्वविरोधकांना कापरे भरायचे. आताच्या उध्दवसेनेचा मेळावा आणि त्यांच्या पक्षप्रमुखांनाच कापरे भरले गेले असे दिसते. भीत्यापोटी ब्रह्मराक्षस म्हणतात. इतके दिवस ठाकरे संघाविषयी जपून बोलायचे. यावेळी त्यांची जीभ घसरली. ठाकरे यांना स्वतःलाच भीती वाटते, ते घाबरलेले भीत्रट झाले असावेत. म्हणून संघाला ब्रह्मराक्षस असे संबोधले. राहुल गांधी नेहमीच संघावर घसरतात, तीच परंपरा आता ठाकरेंचीही झालीय. पण दसरा मेळावा निमित्ताने शुभ बोल ना... म्हणतात. तसे ठाकरेंचे झाले नाही. राजकीय म्हणून भाजपाशी पंगा ठिक आहे. पण आता ठाकरेंनी संघाचेही शत्रुत्व ओढवून घेतले आहे. राज्यात सत्ता गेल्यामुळे ते सैरभैर झालेच आहेत. हताश झालेत. मुंबई महापालिकेत त्यांचा जीव गुंतलाय. हा खजिना अन्य कुणी लुटला तर मग काय? ही भीती. त्यासाठी त्यांचे हिंदुत्व मराठी आणि राज ठाकरेंभोवती पिंगा घालत आहे.

**२०२६ बाळासाहेब ठाकरेंची शताब्दी...** : उध्दव ठाकरेंना घालवणारे त्यांचे सेनापती एकनाथ शिंदे हे काही कमी नाहीत. ठाकरेंनी खुर्चीसाठीच हिंदुत्व सोडले. हिंदुत्वाशी गद्दारी केली, अशी जहरी टीका केली. ठाकरेंचा हिंदुत्वाचा अजेंडा शिंदेसेना राबवते. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी त्यांची कोंडी करण्यासाठी मुंबई असो वा ठाणे येथेही हिंदुत्वाचा मुद्दा असेल, असे ठणकावले. पूरपरिस्थिती पाहता यंदाचा दसरा मेळावा मुंबई, ठाण्यापुरता मर्यादित केला. कारण बळीराजा संकटात आहे. ही जाणीव. शेतकर्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही, याची त्यांनी ग्वाही दिली. त्यांचा हेतू निवडणूकच आहे. पण ठाकरे जायबंदी होण्यासाठी विखाराची भाषा शिंदे चालूच ठेवणार हे स्पष्ट आहे. जाता जाता त्यांनी बाळासाहेब ठाकरेंची आठवण सांगितली. आज बाळासाहेब असते तर तुम्हाला उलटे टांगून मिरचीचा धूर दिला असता, अशी बोचरी टीका केली. संकटात जो घरी बसतो, तो कसला सैनिक अशा शब्दात शिंदे यांनी ठाकरेंना लक्ष्य केले. पुढील वर्षी (२०२६) बाळासाहेब ठाकरेंची जन्मशताब्दी. त्यास अनुसरून शिंदे ठाकरेंना बाळासाहेबांची सातत्याने आठवण करून देत राहणार. पण यानिमित्ताने बाळासाहेबांच्या शताब्दीचे स्मरण करून दिले गेले.

खुद को चाहीए काजू बदाम, पाणी मे उतरे तो सर्दी जुकाम. कपड्याची इस्त्री सांभाळणारा, व्हॅनिटी व्हॅन घेउन दौरा करणारा, वर्क फ्रॉम होम, फेसबुक लाईव्ह करणारा कोण? अशी आभूषणयुक्त शब्दांची पेरणी कुणासाठी असेल बरे? पूरस्थितीमुळे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दसरा मेळावा फार चर्चेत ठेवला नाही. पूरग्रस्तांना मदत केंद्रित त्यांचे धोरण दिसते. पण ठाकरेंची अजूनही टीकाटिपणी संपली नाही. किमान दसर्याच्या दिवशी शुभेच्छा व्यक्त करणारे भाव अपेक्षित होते.

**पुन्हा पाडापाडीची भाषा...** : नागपूर, मुंबई येथील कार्यक्रम, मेळावे नेहमी चर्चेत असायचे. आता यामध्ये मराठवाड्यातील बीडची भर पडली आहे. गोपीनाथ मुंडे यांच्या दसरा मेळाव्याची परंपरा पंकजा मुंडे यांनी चालू ठेवली आहे. यावेळी भगवानगड येथील दसरा मेळाव्यात धनंजय मुंडे यांचीही उपस्थिती होती. मुंडे परिवाराची एकी ही काळाची तसेच उभयतांचीही गरज आहेच. विशेषत: जरांगे यांचे वाढते प्रस्थ ओबीसी समाजाला अस्वस्थ करणारे आहे. पंकजा मुंडे यांनी दसरा मेळाव्यासाठी येताना पीठ, डाळ, गूळ पूरग्रस्तांसाठी आणण्याचे आवाहन केले होते. मुंबईमधील धडक मोर्चानंतर मराठा योध्दा मनोज जरांगे यांना दिल्ली खुणावू लागली आहे. त्यांनी चलो दिल्लीचा नारा दिला आहे. तसेच दसर्या दिवशी आजारी असतानाही सलाईन लावून नारायणगड येथील मेळाव्यातून शक्तीप्रदर्शन केले. त्यांची भाषा पाडापाडीचीच होती. गतवर्षी विधानसभेच्या निवडणुका पाहता तेव्हा देखील जरांगे पाडापाडीची भाषा करीत होते. त्या पलीकडे जाउन पाडापाडीसाठी मुस्लिम धर्मगुरुंशीही हातमिळवणी केली. पण त्यांच्या पाडापाडीचा खेळ तिथेच आपटला. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. आरक्षण विरोधकांना पाडा, असे त्यांनी आवाहन केले. तसेच गॅझेटवरून निवडणुकीत धडा शिकवा, असेही जरांगे म्हणाले. मंत्र्यांना नेत्यांना फिरू देणार नाही. ही धमकी, दमबाजी वाढताना दिसते आहे. त्यांचे लक्ष्य आताचे सरकार आहे. ठराविक पक्ष आणि नेता आहे. हाच धागा पकडून त्यांना राष्ट्रीय नेतृत्व खुणावत असल्याचे दिसते. शेतकर्यांचे नाव पुढे करून राजधानी दिल्लीत काय गोंधळ घातला, हे चार वर्षापूर्वी देशाने पाहिले. पंजाब, हरियाणातील ते शेतकरी नेते कुठे आहेत. अलीकडे पंजाबात मोठा पूर आला. पण त्यांच्यासाठी एक़ही शेतकरी नेता पुढे आला नाही. जरांगे यांना नारायण गडावरून दिल्लीचे लागलेले वेध पाहता, टीका टिपणी आणि पाडपाडीचे विखारी ज्वर यापुढेही वाढत राहणार. पण परिणाम काय?

**भगवानगडावर स्वाभिमानाचा जागर** : रक्तबीजासारखा जातीयवादाचा राक्षस जन्माला आला आहे. तो नष्ट झाला पाहिजे, असे आवाहन पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी केले. जातीयवाद नष्ट करून अठरापगड जातींची मोट बांधण्याचा संकल्प पंकजा मुंडे यांनी दसरा मेळाव्यात भगवान गडावरून केला. आमच्या ताटातले आरक्षण हिरावून घेऊ नका, अशी भावनिक साद घातली. पण त्यांचे लक्ष्य मराठा आंदोलक मनोज जरांगे हे लपून राहिलेले नाही. आरक्षणाला आपला विरोध नाही. पण आमच्या ताटातलं हिरावून घेऊ नका, असे मुंडे यांचे आवाहन होते. दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने राहा. कुणाचे तुकडे उचलू नका. कुणाचे पैसे घेउ नका. खोटे काम करू नका. खोटे धंदे करू नका. गुंड पाळू नका. रक्तबीजासारखे राक्षस संपविण्याची शक्ती दुर्गादेवीने द्यावी, असे साकडे घालत पंकजा मुंडे यांनी जातीय राजकारणावर प्रहार केला. मी कुणाचा रुपाया घेतला नाही, कुणाच्या चहाची मिंधी नाही, असेही त्यांनी ठणकावले. दसरा मेळावा ही राष्ट्रसंत भगवान बाबाची परंपरा आहे. ती खंडित होऊ द्यायची नाही, असा निर्णय मी आणि पंकजाताईंनी घेतला, असे धनंजय मुंडे म्हणाले. राजकीय नेत्यांमध्ये बेकीचे चित्र दिसत असताना बीडमध्ये मात्र भाउ,बहीण यांनी एकीचा संदेश दिला. तसेच बीडची अलीकडच्या काळात झालेली बदनामी पुसण्याचाही त्यांचा हेतू अधोरेखित झाला. बीडचे दोन मेळावे दोन अर्थाने चर्चेत राहिले, पाडापाडी आणि एकी यामध्ये अस्तित्वाची लढाई आहे हे मात्र नक्की...

**चिंतन : विजयकुमार पिसे, ८८८८८४७२५६**
**(विभाग सहमंत्री, विहिंप प.महाराष्ट्र प्रांत)**

◈ ◈ ◈

# अंगणातील तुळस आणि घरातील लेक हिंदुत्वाची शान!

हिंदू धर्म हा जितका प्राचीन आहे तितकाच त्यातील प्रत्येक धर्म प्रतिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोष्टींना धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक दृष्ट्या अत्यंत महत्त्व आहे. जसे गोमाता ही हिंदू धर्मातील सर्वात श्रेष्ठ व पूजनीय आहे तसेच अंगणात लावली जाणारी तुळस ही देखील पूजनीय हिंदू प्रतिक आहे.

'श्रीमद्देवीभागवत' मध्ये सांगितले आहे, 'फुलांमध्ये कुणाशीही जिची तुलना होऊ शकत नाही, जिचे महत्त्व वेदांमध्येही वर्णिलेले आहे, जी सर्व अवस्थांमध्ये सदैव पवित्र रहाते, जी 'तुळशी' नावाने प्रसिद्ध आहे, जी भगवंतासाठी शिरोधार्य आहे, जी सर्वांची आवडती आहे, तसेच जी संपूर्ण जगाला पवित्र करणारी आहे, त्या जीवन्मुक्त, मुक्तीदायिनी आणि श्रीहरिंची भक्ती प्रदान करणार्या भगवती तुळशीची सारे उपासना करतात.

नमो नमस्ते तुलसी पापं हर हरिप्रिये।। तुलसी श्रीर्महालक्ष्मीर्विद्याविद्या यशस्विनी। धर्म्या धर्मानना देवी देवीदेवमनः प्रिया।। लभते सुतरां भक्तिमन्ते विष्णुपदं लभेत्।

या प्रकारे तुळशीला गौरविले आहे.

तुळशीचे महत्त्व :-

१) तुळशीचे धार्मिक महत्त्व -

देवाला नैवेद्य दाखवताना किंवा त्यांना जल अर्पित करताना त्यात एक तुळशीचं पान ठेवणे आवश्यक असतं.

श्राद्ध पक्ष व पिंड दानाच्या वेळी तुळशीच्या पानांचा मोक्षप्राप्ती साठी वापर केला जातो.

तुळशीच्या काड्यांचा वापर हा काडवाती करून देवाची आरती करण्यास केला जातो.

२) वैज्ञानिक महत्त्वः-

वैज्ञानिक संशोधनात हे स्पष्ट झाले आहे की, तुळशीत विद्द्युत् तत्वाची निर्मिती करण्याचे आणि शरिरात ते तत्त्व टिकवून ठेवण्याचे अद्भुत सामर्थ्य आहे.

तुळशीजवळ बसून दीर्घ श्वास घ्या आणि सोडा, तर आरोग्य चांगले राहील, तसेच दमा होण्याची शक्यता अल्प होईल. तुळशीला स्पर्श करणारी हवा श्वासावाटे शरिरात घेतल्यास रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

शरीर परिष्कृत करण्याबरोबरच तुळशी वातावरण शुद्ध करते आणि वातावरणास संतुलित ठेवण्यास मदत करते. तुळशी म्हणजे अतुलनीय, सुवासिक, कडू, रुचकर आहे. ती सर्दी, खोकला, वर्म्स आणि भूल देण्याकरिता पाचक क्षमता आणि त्याचबरोबर प्रतिनाशक म्हणून वापरली जाते.

हिंदू धर्मात तुळशीला घराची मर्यादा म्हणून ओळखले जाते. ती जणू प्रत्येक हिंदू घराची शान म्हणून अंगणात डौलत असते. प्रसन्नतेचे , सात्विकतेचे आणि पवित्रतेचे प्रतीक म्हणजे तुळस! त्यामुळे आपल्या हिंदू धर्मात रोजच्या तुळशी पूजनास तर महत्त्व आहेच त्याचबरोबर दिवाळीच्या सणानंतर येणाऱ्या कार्तिकी एकादशीला तुळशी विवाह हे व्रत देखील केले जाते. चातुर्मासाची सांगता आणि तुळशी विवाह असे ह्या दिवसाचे महत्व आहे. त्यामुळे त्याला प्रबोधिनी एकादशी असेही म्हणतात. तुळशी विवाहाची परंपरा संपूर्ण भारतात वैविध्यतेने साजरी केली जाते. तुळशी विवाह केल्याने कन्यादानाचे पुण्य मिळते तसेच सांसारिक जीवनात सुख आणि समाधान मिळते असे मानले जाते. तुळशी विवाहानंतर घरातील लेकीचे लग्न करून दिले जाते. म्हणूनच जशी अंगणातली तुळस ही हिंदूंची शान आहे तशीच प्रत्येक हिंदू घरातील लेक ही देखील एक शान आहे. आणि आताच्या परिस्थितीत आपण हिंदू धर्म टिकवण्यासाठी अंगणातली तुळस आणि घरातील लेक जपणे अनिवार्य आहे.

सध्याच्या काळात भारताच्या अनेक भागांत लव जिहाद च्या घटना वाढत आहेत तसेच हिंदू मुलींना फसवून त्यांना

धर्मांतर करायला भाग पाडले जात आहे. त्यामुळे आपल्या मुलींना उच्चशिक्षित करण्याबरोबर आपले हिंदू संस्कार देणे ही निकडीचे आहे. या करता मुळात पालकांनी जागरूक राहणे गरजेचे आहे तसेच आपली कुटुंबसंस्था ही सामाजिक बांधिलकी जपत असते. म्हणून ह्या धावपळीच्या जगात आपल्या मुलांना पुरेसा वेळ देणे, त्यांना प्रेम देणे आवश्यक आहे. तसे केल्यास आपली मुले बाहेर प्रेमाचा आधार शोधणार नाहीत.

आपल्या मुलींना तसेच मुलांना देखील सध्य परिस्थिती समजून सांगणे गरजेचे आहे. आपल्या हिंदू संस्कृतीत असणाऱ्या परंपरांचे योग्य ते विश्लेषण करून मुलांच्या मनात हिंदुत्वाबद्दल प्रेम व आपुलकी निर्माण करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

घरातली लेक म्हणजे एक मर्यादा असे आपल्या धर्माची शिकवण आहे, कारण मर्यादा ही स्थिर असते तसेच ती दृढ निश्चयी असते. ज्या प्रकारे तुळस ही नकारात्मकता दूर करते त्याच प्रकारे घरातली लेक ही घरातील वातावरण आनंदमय करते. तुळस जशी सर्वश्रेष्ठ आहे तसेच एक स्त्री कायम घरावर संकट आल्यास दुर्गेप्रमाणे त्यास सामोरे जाते. याचप्रमाणे, एक लेक ही लग्न झाल्यावर दोन कुटुंब एकत्र आणते व घरातील वंश पुढे नेते म्हणजेच एक प्रकारे ती आपला हिंदू धर्म वृद्धिंगत करण्याचे व जपण्याचे कार्य करते. म्हणून आपली लेक ही जपली पाहिजे. तिला अन्यायाविरोधात लढायला शिकवले पाहिजे. आपल्या धर्माचे चांगले संस्कार व परंपरा माहिती करून देणे तसेच आपल्या भारतीय संस्कृती बद्दल आदर निर्माण करणे हे येणाऱ्या काळातल्या पिढीकरीता अत्यावश्यक आहे.



सध्याच्या काळात हिंदू धर्मावर लव जिहाद व वोट जिहाद चे संकट ओढवले आहे जे आता जरी गंभीर वाटत नसले तरी येणाऱ्या काळात मात्र त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील त्यामुळे आताच सावध होणे आवश्यक आहे. हिंदू धर्म बचावासाठी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, योग मंडळ, राष्ट्र सेवा समिती हे आणि असे अनेक लोक एकत्र येऊन काम करत आहेत. परंतु फक्त काही गटाने येऊन हिंदू धर्माचा प्रचार व प्रसार करावा इतके मर्यादित हे कार्य नव्हे म्हणूनच वंदनीय मावशी केळकर यांनी सांगितलेल्या जीवनधारक चतु:सूत्री जसे :-

१) सामाजिक अज्ञान दूर करणे

२) धर्माचे यथार्थ ज्ञान देणे

३) श्रद्धास्थान बनवणे

४) अध्यात्माचा आधार घेणे

ह्या गोष्टी राष्ट्रविकास करण्यासाठी मनामनात रुजवणे गरजेचे आहे. कारण राष्ट्राचे केंद्र म्हणजे कुटुंब व कुटुंबाचे केंद्र म्हणजे माता म्हणजेच एक लेक / कन्या!

म्हणूनच हिंदू धर्म संरक्षणासाठी आपल्या अंगणातली तुळस आणि आपल्या घरातली लेक जपली पाहिजे.

राष्ट्र नेऊ परम वैभवा

भारत माता की जय

**ॲड. स्वाती जेरे**

◈ ◈ ◈



# शिलाहार राजांची मंदिरे

राष्ट्रकूटांच्यानंतर महाराष्ट्राच्या पश्चिम भागात सत्ता होती ती शिलाहार राजसत्तेची. संपूर्ण महाराष्ट्रात नसली तरी पश्चिम महाराष्ट्रात शिलाहार राजांनी देखणी मंदिरे उभारली. ही मंदिरे भूमीज शैलीत उभारली होती. आजच्या लेखात आपण शिलाहार राजांनी बांधलेल्या मंदिरांची आणि त्यांच्या शैलीची माहिती घेऊया.

महाराष्ट्रामध्ये शिलाहार राजवट येईपर्यंत महाराष्ट्राची अशी स्वतःची कोणतीही मंदिर शैली नव्हती. आधीच्या राजवटीत राष्ट्रकूट राजांनी द्राविड शैलीचाच वापर करून मंदिरे बांधली किंवा खोदली. महाराष्ट्राला भूमीज शैली मिळाली ती शिलाहार राजांमुळे. शिलाहार राजांनी मध्य भारतातीळ नुकत्याच उदयाला आलेल्या भूमीज शैलीचा वापर मंदिर बांधण्यासाठी केला. ही शैली कुणी विकसीत केली याबद्दल ठोस विधान करता येत नाही पण भूमिज शैली ही मध्यभारत, विशेषतः महाराष्ट्र, मध्य प्रदेश, व राजस्थान या प्रदेशांत आढळून येते.

भूमिज शैलीचा उगम नागर शैलीतून झाल्याचे मानले जाते. नागर शैलीच्या शिखरावरून विकसित झालेली भूमिज रचना अधिक संतुलित, भूमितीय आणि स्थापत्यदृष्ट्या सुबक आहे. 'भूमिज' या शब्दाचा अर्थ 'भूमीपासून उदयास आलेली' असा आहे, आणि त्यामुळे या शैलीतील मंदिरांचे शिखर जमिनीतून हळूहळू उंचावत जाते, जणू भूमीतून उमलत आहे असे भासते. भूमिज या शब्दाची आणखीन व्युत्पत्ती सांगितली जाते. ती अशी की या मंदिरांच्या शिखरांवर अनेक टप्पे असतात. त्यातला एक एक टप्पा म्हणजे एक भूमी आणि त्यामुळे या मंदिर शैलीचे नाव भूमीज असे पडले.

या शैलीतील मुख्य घटकांमध्ये गर्भगृह, मंडप, अंतराळ आणि शिखर यांचा समावेश होतो. शिखर हे या स्थापत्याचे सर्वात आकर्षक अंग आहे. त्यामध्ये लघुशिखरे (उरुश्रृंग किंवा कूटस्तंभ) सममितीय पद्धतीने मुख्य शिखराभोवती रचलेली असतात. या लघुशिखरांची मांडणी जणू एखाद्या पिरॅमिडसदृश आकार निर्माण करते. प्रत्येक लघुशिखरावर सूक्ष्म कोरीव काम, देवतामूर्ती, पुष्पवेल आणि अलंकारिक पट्ट्या आढळतात. या व्यतिरिक्त भूमिज शैली ओळखायची खूण म्हणजे मंदिरच्या शिखराच्या चारही बाजूने उभ्या पट्ट्या आपल्याला पाहायला मिळतील. यांना लता असे म्हणतात.

शिलाहार राजा चित्तराजा याने भूमिज शैलीतील मंदिर सर्वप्रथम महाराष्ट्रातील अंबरनाथ येथे बांधून पूर्ण केले. ते वर्ष होते साधारण सन १०६०. पण भूमिज शैलेतील मंदिर उभारण्यास सर्व प्रथम सुरुवात झाली ती माळव्यात. विदिशा जवळील उदयपूर येथे नीलकंठेश्वर नावाचे एक मंदिर आहे जे परमार राजा उदयादित्यने बांधून पूर्ण केले. ही मंदिर जरी सन १०८० च्या आसपास पूर्ण झाले असले तरी असे म्हणतात की यांची उभारणी करण्याची सुरुवात ही अंबरनाथ मंदिराच्या अगोदरची आहे. भूमिज मंदिर शैलीचे श्रेय त्यामुळे परमार राजवटीमधील राजांना देण्यास हरकत नाही कारण याच राजवटीमधील राजा भोज याने समरांगण सूत्रधार नावाचा ग्रंथ लिहिला ज्यामध्ये भूमिज मंदिर शैलीबद्दल सखोल माहिती दिलेली आपल्याला आढळून येते.

स्थापत्यशास्त्राच्या संदर्भात भूमिज शैलीचा उल्लेख समरांगण सूत्रधार या अकराव्या शतकातील हिंदू ग्रंथाच्या ६५ व्या अध्यायात आढळतो. हा ग्रंथ मंदिर तसेच वास्तुकलेवरील (वास्तु) एक प्राचीन आणि महत्त्वपूर्ण ग्रंथ मानला जातो. अपराजितपृच्छा या बाराव्या शतकातील दुसऱ्या हिंदू वास्तुशास्त्रीय ग्रंथामध्ये भूमिज शैलीला उत्तर भारतीय नागर मंदिर स्थापत्याच्या चौदा प्रमुख शैलींपैकी एक म्हणून गणले आहे.

यावरून हे स्पष्ट होते की भूमिज स्थापत्यशैली अकराव्या शतकापूर्वीच उदयास आली होती, ती तेव्हापर्यंत यशस्वी व सर्वत्र स्वीकारलेली होती आणि त्यामुळेच त्या काळातील संस्कृत स्थापत्यग्रंथांमध्ये तिचा उल्लेख आढळतो.

सन् १९७५ मध्ये प्रकाशित झालेल्या आपल्या लेखात श्री. माटे यांनी असा निष्कर्ष मांडला आहे की भूमिज शैलीचा प्रारंभ नवव्या शतकातच झाला असावा आणि ती दहाव्या शतकात

पूर्णपणे विकसित व प्रस्थापित झाली. इ.स. १९८० च्या दशकात, मध्य प्रदेशाच्या दुर्गम भागात प्रवास केल्यानंतर बौद्ध व हिंदू कला इतिहासाचे अभ्यासक डोनाल्ड स्टॅटनर यांनी इ.स. ७व्या ते ८व्या शतकातील पूर्व–भूमिज (Proto-Bhumija) मंदिरांची उदाहरणे प्रकाशित केली. त्यांच्या या संशोधनामुळे भूमिज स्थापत्यशैलीचा मूळ कालखंड आणि तिचा उगमस्थान याबाबतची पूर्वीची मांडणी बदलली गेली.

स्टॅटनर यांच्या मते, दक्षिण–कोसल (आधुनिक छत्तीसगड) प्रदेशातील पश्चिम भाग – जो माळव्याच्या पूर्व दिशेला आहे – येथे पांडुवंशी काळात (प्रतीहार आणि कच्छपघाट परंपरेच्या अधीन) भूमिज स्थापत्यावर आधारित आरंभीचे प्रयोग झाले असावेत. या काळातील मंदिरांनी तारकाकृती आराखड्याचा (stellate plan) वापर करून नाविन्यपूर्ण रचनांची निर्मिती केली. याच स्थापत्य परंपरेचा पुढील विकास आणि परिपूर्णता माळवा प्रदेशात इ.स. ९व्या ते १०व्या शतकादरम्यान झाला.

महाराष्ट्रामध्ये शिलाहार राजवटीमध्ये अनेक मंदिरांची निर्मिती झाली. यामध्ये उल्लेखनीय मंदिरे म्हणजे अंबरनाथ येथील शिवमंदिर, कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिर, कोपेश्वर मंदिर, संगमेश्वर जवळील कर्णेश्वर मंदिर इत्यादि. भूमिज शैलीमुळे महाराष्ट्रातील मंदिरांचा इतिहासच बदलून गेला. शिलाहार राजवट गेल्यावर महाराष्ट्रात यादव घराण्याचे राज्य आले आणि या घराण्याने संपूर्ण महाराष्ट्रात अनेक मंदिरांची निर्मिती केली. यामध्ये तेराव्या शतकात अनेक मंदिरांची निर्मिती झाली जी भूमिज शैलीत बांधली गेली. या काळात हेमाद्री नावाचा एक प्रधान यादवांकडे होता आणि तो कलेचा मोठा भोक्ता होता त्यामुळे या मंदिर शैलीस बोलीभाषेत हेमाडपंथी मंदिरे असे म्हणले गेले. आजही महाराष्ट्रातील जुन्या मंदिर शैलीस हेमाडपंथी शैली असेच म्हणतात. स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने या शब्दास कोणताही अर्थ नाही आणि भूमिज हाच योग्य शब्द आपण सर्वांनी वापरला पाहिजे.

शिलाहार आणि यादव राजवट गेल्यावर महाराष्ट्रात पुढे इस्लामी सत्ता आली जी साधारण ३०० वर्षे टिकली आणि या वर्षात अगदी थोड्या मंदिरांची निर्मिती झाली मात्र त्याची ठोस शैली अशी सांगता येत नाही आणि पुढे थेट अठराव्या शतकात पेशव्यांच्या काळात मंदिरांची उभारणी पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात झाली.

गेल्या ६ लेखातून आपण महाराष्ट्रातील प्राचीन मंदिर शैली थोडक्यात समजावून घेतल्या. आता पुढील लेखांपासून आपण क्रमवार महत्वाच्या मंदिरांची थोडक्यात माहिती घेऊ..!

**शंतनू परांजपे**

◈ ◈ ◈






करा जगाची सफर !
जनसेवा आहे हमसफर !
जनसेवा पर्यटन कर्ज
देश / विदेशातील पर्यटनासाठी
रू. 5.00 लाखापर्यंत कर्ज
व्याजदर - 11 %
प्रोसेसिंग फी - 0 % *
रुपये 1.00 लाखासाठी EMI
12 महिने - 8,838.00
24 महिने - 4,661.00
36 महिने - 3,274.00
संपर्क : 98222 51834
8485871252
marketing@janasevabankpune.in
* अटी लागू
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय :
प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

वार्षिक वर्गणी रु. २००/- फक्त

Date of Publication : 26/10/2025 and
Date of Posting : 28/10/2025 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध (मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे 'हिंदुबोध'.

● मासिक मुल्य रु. २०/- ● वार्षिक वर्गणी रु. २००/- ● त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/-

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

oooo

## * हिंदुबोध जाहिरात दरपत्रक *

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

| | | | |
|---|---|---|---|
| रंगीत पूर्ण पान रु. १.५ लाख | साधे पान रु. १ लाख | साधे अर्धे पान रु. ५०,०००/- | साधे १/४ पान रु. २५,०००/- |
| साधे १/८ पान रु. १२,०००/- | साधे १/१६ पान रु. ६,०००/- | सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) रु. २,१००/- | |
| हिंदुबोध अंक मुल्य रु. २०/- | वार्षिक वर्गणी रु. २००/- | त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/- | |

## * हिंदुबोधची वर्गणी *

जनता सहकारी बँक लि. शनिवार-नारायण पेठ शाखा, पुणे - ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb

**कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध**

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

**हिंदुबोध**

व्दारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२
विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,
भारत भवन, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी : ०२०-२४४७१७०१